cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१३९ | सोमवार दि.०९ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये






# केंद्राकडून ९० दिवसांसाठी हमीभावाने सोयाबीन खरेदी होणार

## कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना यश; केंद्र सुरू करण्यास मान्यता, ४८९२ हमीभाव मिळणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे मागील काही दिवसांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून केंद्र सरकारने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांमध्ये ९० दिवसांसाठी किमान हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार समर्थन मूल्य योजनेच्या अंतर्गत सोयाबीन व उडीद ही दोन पिके ९० दिवसांसाठी हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे सोयाबीनला ४८९२ रुपये हमीभाव असून यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.**



केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान हे राज्य कृषी महोत्सवाच्या निमित्ताने परळीत आले तेव्हा धनंजय मुंडे यांनी याबाबत मागणी केली होती, तसेच दिल्ली येथे भेटूनही याबाबत पाठपुरावा केला होता. केंद्र सरकारने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांमध्ये सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ही ४८९२ रुपये प्रति क्विंटल इतकी निश्चित केली असून, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांसह वेळोवेळी पाठपुरावा व समर्थन देणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत.

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत व्हावी व त्यांचे बाजारभाव पडल्याने नुकसान होऊ नये या दृष्टीने हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी, त्याचबरोबर सोया मिल्क, खाद्यतेल, सोया केक इत्यादी उत्पादने आयात करण्यावर शुल्क लावावे तसेच सोयाबीन निर्यातीसाठी प्रतिक्विंटल किमान ५० डॉलर अनुदान द्यावे याबाबत मी केंद्र सरकारकडे सातत्याने पत्र व्यवहार व पाठपुरावा केला तसेच यासंदर्भात ◀◀ पान २ वर

### अनुदानाचे ४२०० कोटी रुपये वितरित होणार

मागील वर्षी सोयाबीन चे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. मात्र त्याही परिस्थितीत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा करून राज्य शासनाच्या वतीने सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला. यासाठी राज्य सरकारने ४२०० कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून दिले असून येत्या दोन–तीन दिवसात या अनुदानाचे थेट वितरण शेतकऱ्यांच्या खात्यावरती करण्यात येणार आहे.

# गणेश चतुर्थीनिमित्त सरकारचे खास गिफ्ट

## आता फक्त १०० रुपयांत आनंदाचा शिधा, ४ वस्तू मिळणार

**मुंबई । प्रतिनिधी**

सध्या संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सवाची धूम आहे. दरवर्षी गणेशोत्सवादरम्यान घरोघरी गोडधोड जेवण तयार केलं जातं. महाराष्ट्र सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने हाच उत्सव डोळ्यासमोर ठेवून एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारकडून पुन्हा एकदा आनंदाचा शिधा हा उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमाअंतर्गत पात्र कुटुंबांना फक्त १०० रुपयांत चणाडाळ, तेल, साखर, रवा मिळणार आहे. आनंदाचा शिधा उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी सरकारने मात्र काही अटी ठेवल्या आहेत.

गणेश चतुर्थीचे निमित्त साधून ◀◀ पान २ वर




### कोणाला मिळणार लाभ?

सराकरच्या या उपक्रमाचा लाभ जे कुटुंब अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधरक आहे, त्यांना मिळणार आहे. सोबतच प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांनाही हा आनंदाचा शिधा दिला जाईल. छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांना तसेच नागपूर विभागातील वर्धा जिल्हा अशा एकूण १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील (एपीएल) केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना हा आनंदाचा शिधा मिळणार आहे.

# मी कोणाच्या नादी लागत नाही माझ्याही कोणी नादी लागू नये

## मनोज जरांगे पाटलांचा परळीतील घोंगडी बैठकीतून देवेंद्र फडणवीसांना थेट इशारा



**दत्तात्रय काळे । परळी**

आरक्षणाची लढाई आपल्याला जिंकायची आहे. त्याशिवाय मराठा समाजाला गत्यंतर नाही. राजकारण येत राहील, होत राहील. मात्र अरक्षणापासून मराठा समाजाचे एकही घर वंचित राहणार नाही याची आपल्याला काळजी घ्यावी लागणार आहे. आरक्षणाच्या लढाईत आपण आता अंतिम टप्प्यात आहोत. शासनालाही आता आरक्षण दिल्याशिवाय पर्याय नाही. सरकारने जर आरक्षण नाही दिले तर त्यांना परत आपल्याला सत्तेवर येऊ द्यायचे नाही. देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या विरोधात ट्रॅप रचला आहे, दररोज एक आमदार माझ्यावर गरळ ओकत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या नादाला लागू नये अन्यथा महाराष्ट्रात भाजपला बियाला माणूस उरणार नाही असा ◀◀ पान २ वर

### भव्यदिव्य शोभायात्रा आणि सत्कार

मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे रविवारी परळी वैजनाथ येथे घोंगडी बैठकीच्या निमित्ताने आले होते. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पुतळ्यास हार घालून अभिवादन केले. यानंतर शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. मराठा समाज बांधवांच्या वतीने जरांगे पाटील यांचे भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. जेसीबीच्या साहाय्याने त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

### रात्री भेटण्यास येणाऱ्यांची नावे अजून सांगितली नाही

रात्रीच्या भेटी घेणारे तर संख्या खूप मोठी आहे. त्यातही भाजपचे लोक जास्त आहेत. राजकीय अस्तित्व धोक्यात आल्याने ते मला भेटायला येतात, म्हणून मला रात्रभर जागावे लागते. मला कुठल्याही राजकीय भूमिकेत अजिबात जायचे नाही. मी कोणत्याही नेत्यांच्या स्वतःहून वाट्याला गेलो नाही. मात्र जर माझ्या आणि समाजाच्या वाट्याला गेले तर मात्र त्यांची हायगय केली जाणार नाही. मी असल्यांना अजिबात सुट्टी देणार नाही हे परळीच्या पवित्र भूमीतून सांगतो असाही इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

# शिरूर : ६८ गावांचा मनोज जरांगे पाटील नावाने एक गणपती

मानूर । शाहेबाज पठाण

मागीलवर्षी दक्षिण महाराष्ट्रातील ७५३ गावांनी एक गाव एक गणपती हा उपक्रम राबविला. यामुळे या गावांत एकाच गणेशमूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली. यंदा मराठवाड्यात एका नव्या गणेश मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील शिरूर शहरात मराठा आरक्षण योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नावाने ६८ गावांनी मिळून एक गणेश मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

### राज्यातील एकमेव मंडळ, उपक्रमाची सर्वस्तरातून चर्चा

राज्यातील हे एकमेव गणेश मंडळ असून मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राजवाड्यासारखा भव्य मंडप उभारण्यात आला असून संपूर्ण मंडप वॉटरप्रुफ स्वरूपाचा देण्यात ◀◀ पान २ वर

# मनोज जरांगे-धनंजय मुंडेंची गुप्त भेट

**बीड । प्रतिनिधी**

**मध्यरात्री राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे आणि मराठा आरक्षणाचा लढा उभारणारे मनोज जरांगे पाटील यांची भेट झाली. अर्थात ही गुप्त भेट सकाळ होताच उघड झाली. ही भेट झाल्याची जरांगे पाटलांनी कबूलसुद्धा केले. मात्र धनंजय मुंडे यांनी मात्र अशी भेट झालीच नसल्याचे सांगितले. मनोज जरांगे आणि धनंजय मुंडेंच्या या गुप्त भेटीनंतर बीडसह मराठवाड्याच्या राजकारणावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.**

### लोकसभेतील फटका विधानसभेमध्ये बसू नये यासाठी मुंडेंची हालचाल?

परळीतील नाथ प्रतिष्ठानच्या सार्वजनिक गणेश मंडळाचे धुमधडाक्यात आगमन झालं. रात्री साडेदहा ते साडेअकरा वाजेपर्यंत धनंजय मुंडे यांच्या या व्यासपीठावर पुष्पा फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना, क्रिती सेनन यांच्यासोबतच राज्यातील दिग्गज कलावंत सहभागी झाले होते. खरं तर हा कार्यक्रम जरी गणेश उत्सवाचा असला तरी धनंजय मुंडे यांनी मात्र त्यांच्यावर टीका करणाऱ्याला या भाषणात झोडून काढले. परळीच्या कार्यक्रमानंतर अंतरवालीकडे गाड्यांचा ताफा वळला अर्थात हा सगळा कार्यक्रम सगळ्या समोरच फुलला होता. मात्र त्यानंतर रात्री १२ वाजताच धनंजय मुंडे यांच्या ताफ्यातील गाड्या अंतरवली सराटीकडे वळल्या. यावेळी कुणालाच माहीत नव्हते की आता मनोज जरांगे पाटलांना भेटायला जायचे आहे. दोन तासात धनंजय मुंडे अंतरवाली सराटीला पोहोचले. आंतरवालीच्या सरपंचाच्या घरी धनंजय मुंडे थांबले आणि थोड्याच वेळात मनोज जरांगे पाटील हे ◀◀ पान २ वर

# राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष सुभाष राऊत यांचा जन्मगावी सत्कार

## गावकऱ्यांनी बैलगाडीतून काढली भव्य मिरवणूक!

केज । प्रतिनिधी

अखिल भारतीय समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ना. ॲड. सुभाष (भाऊ) राऊत यांची राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) निवड झाल्याबद्दल चिंचोलीमाळी या त्यांच्या मूळ गावी भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. सत्कार समारंभ पूर्वी बैलगाडीतून वाजत गाजत भव्य मिरवणूक काढून जेसीबीतून फुलांचा वर्षाव, फटाक्यांची आतिषबाजी करत भव्य दिव्य नागरी सत्कार आज चिंचोली माळी येथे करण्यात आला आहे.



राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा. ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांना आयुष्यातील पांडुरंग मानत समता परिषदेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदापासून भुजबळ साहेबांवर आलेल्या प्रत्येक संकटाप्रसंगी साथ देत एकनिष्ठ राहून स्वतःच्या संसाराची राख रांगोळ ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०४ सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १२.५० क्विंटल | २,६१० | ३,२८० | २,८११ |
| ज्वारी/हायब्रिड :१२३.०० क्विंटल | २,००० | ३,००१ | २,२७० |
| मूग : १११.०० क्विंटल | ५,९०० | ८,२७५ | ७,५७९ |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : ५६.५० क्विंटल | ७,००१ | ८,००० | ७,५७९ |
| बाजरी:२६.५० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,४४८ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १९४.५० क्विंटल | ४,५५० | ४,६२५ | ४,५७७ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,७०० | ७,२०० | ६,७०० |

# गणेशोत्सवातील लोककलांवर टीका म्हणजे संस्कृती व कलाकारांचा अपमान - धनंजय मुंडे

## नाथ प्रतिष्ठान आयोजित वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे शानदार उद्घाटन

### अभिनेत्री रश्मीका मंदाना व कृती सेनन यांनी जिंकली परळीकरांची मने

**परळी वैजनाथ। प्रतिनिधी**

**गेल्या अनेक वर्षापासून नाथ प्रतिष्ठान अविरतपणे वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाच्या माध्यमातून सांस्कृतिक मेजवानी व महाराष्ट्रातील कलाकारांच्या कलेला एक भव्य दिव्य व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम करत आहे. मात्र काही लोकांच्या हे पोटात दुखत असून या कार्यक्रमावरून टीका करण्याचे काम काही जण करत असल्याचे सांगून विरोध करणाऱ्यांवर कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी जोरदार हल्लाबोल केला. धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या १९ व्या वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे शानदार उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेत्री पुष्पा फेम रश्मिका मंदांना व आदीपुरुष रामायणातील सीताफेम कृती सेनान यांच्या प्रमुख उपस्थिती झाले. यावेळी तमाम परळीकरांना स्मित हास्य देत रश्मिका मंदांना व गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष करत अभिनेत्री कृती सेनान यांनी उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.**



धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही परळीकरांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी म्हणजेच वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात दिग्गज कलाकारांच्या कार्यक्रमांचे व कला सादरीकरणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमाचे शानदार उद्घाटन स्व.पंडित अण्णा मुंडे सहभागृह, जत्रा मैदान, परळी येथे आज झाले. यावेळी व्यासपीठावर धनंजय मुंडे यांच्यासह नॅशनल क्रश म्हणून ओळख असलेली पुष्पा फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना तसेच आदीपुरुष रामायण चित्रपटातुन देशाच्या घराघरात पोहोचलेली सीतेचा अभिनय ◀◀ पान २ वर

### कुछ नाले खुद को समंदर समझ बैठे है !

दरम्यान राज्यात निवडणुकांचे वारे वाहू लागले असून अनेकजण तयारीला लागले आहेत. परळी विधानसभा मतदारसंघात देखील अनेक इच्छुक वेगवेगळ्या पक्षांकडून तयारी करत असून, वेगवेगळ्या अफवा पसरवणे व टीका करण्याचे काम करत आहेत, त्यांना धनंजय मुंडे यांनी त्यांच्या खास शैलीत सही वक्त पर करवा देंगे हदो को एहसास, कुछ नाले खुद को समंदर समझ बैठे है या खास शायरीतून ईशारा दिला आहे.

cmyk

## अग्रलेख

# बुद्धिदात्या सद्-बुद्धी दे!

देशभरातच नव्हे तर जगातील अनेक देशांमध्ये भक्तांच्या लाडक्या बाप्पांचे धुमधडाक्यात आगमन झाले आहे व सगळे गणेशोत्सवाच्या जल्लोषात दंग झाले आहेत. घरोघरी झालेल्या बाप्पांच्या आगमनाबरोबरच महानगरापासून गावखेड्यापर्यंतच्या सार्वजनिक गणेशोत्सवातील गणेश मूर्तीचीही उत्साहात स्थापना झाली आहे. लाडक्या बाप्पांचे आगमन सर्वांमधले सगळे भेदाभेद दूर करून चैतन्य, उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण करणारे असते. जसा गरीब बाप्पांच्या आगमनाने आनंदतो तसाच श्रीमंतही बाप्पांच्या चरणी भक्तिभावाने लीन होतो.

बाप्पा जसा सुखकर्ता आहे तसाच तो विघ्नहर्ता व दु:खहर्ताही आहे. त्यामुळे बाप्पांचे आगमन म्हणजे उत्सवाची नांदीच! आपल्या देशात तर उत्सवप्रियता ओथंबून वाहते त्यामुळे बाप्पांच्या आगमनाचा उत्सव तर दणक्यात साजरा होणे साहजिकच! त्यात वावगे काही नाहीच. उत्सव माणसाच्या जगण्याला प्रेरणा देतात, त्याला आशावादी व सकारात्मक बनवतात! ही सकारात्मक ऊर्जा प्रत्येकाला हवी असते व ती गणेशोत्सवातून मिळते. त्यामुळेच बाप्पांच्या आगमनाचा उत्सव सालोसाल वाढत जाणारा आहे. देशभर विशेषत: महाराष्ट्रात गणेशोत्सवापासून बाजारपेठेत उलाढाल प्रचंड वाढते व बाजारपेठेत एक अर्थचैतन्य निर्माण होते.

गणेशोत्सवापासून बाजारपेठेत निर्माण होणारे हे चैतन्य वर्ष संपेपर्यंत विविध निमित्ताने कायम राहते. त्यातून अर्थकारणाला जी गती मिळते ती कोट्यवधी हातांना तात्पुरता का असेना पण रोजगार उपलब्ध करून देते. एका अंदाजानुसार गणेशोत्सवामुळे बाजारपेठेत होणारी आर्थिक उलाढाल ८० हजार कोटी रुपयांच्या जवळपास होऊ शकते. एकीकडे हे अर्थचक्रासाठीचे अत्यंत आश्वासक चित्र असले तरी दुसरीकडे सार्वजनिक गणेशोत्सवात जे धांगडधिंगा घालण्याचे, ध्वनी, प्रकाश, हवा अशा पर्यावरणाच्या प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस एवढे वाढत चालले आहे की, दरवर्षी 'मागच्या वर्षीचा गोंधळ बरा होता,' असे स्वत:चे समाधान करून घेण्याची वेळ येते. एकूणच बुद्धिदात्याच्या उत्सवात बुद्धी गहाण ठेवून सार्वजनिक गणेशोत्सवाने सांस्कृतिक प्रदूषणाचीही हद्द पार केल्याचे चित्र राज्यात गल्लोगल्ली पहायला मिळते आहे. त्यामुळे उत्सवाच्या नावावर होणा-या या सांस्कृतिक व सामाजिक अध:पतनाची खरोखरच गरज आहे का? असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय रहात नाही.

विशेष म्हणजे ज्यांनी या सगळ्या अपप्रवृत्तींवर अंकुश ठेवला पाहिजे ते राज्यकर्ते व त्यांच्या हुकूमावर नाचणारे प्रशासन या धांगडधिंग्यात उत्साहाने सहभागी होताना दिसतात. राजकीय नेत्यांना उत्सवात मिळणारी आयती गर्दी आपले राजकीय व निवडणुकीचे गणित बसवणारी वाटत असल्याने खुणावते आणि मग जास्तीत जास्त गणेश मंडळांना, त्यांच्या पदाधिका-यांना 'आपलेसे' करण्यासाठीची स्पर्धा राजकीय नेत्यांमध्ये रंगते. जे सत्तेवर आहेत ते अर्थातच या स्पर्धेत आघाडीवर असतात. गणेश मंडळांना फुकट वीज देण्यापासून भर रस्त्यात मंडप घालून रस्ताच बंद करण्यापर्यंतच्या सगळ्या कामात सत्ताधारी मंडळी तात्पुरते मदतकार्य करत असते व त्यांच्या इशा-यावर प्रशासन कार्यरत असते. त्यामुळे हल्ली राज्यात गणेशोत्सवच नव्हे तर सर्वच उत्सव, सार्वजनिक कार्यक्रम वगैरेमध्ये 'नियम पाळा'च्या ऐवजी 'बिनधास्त नियम पायदळी तुडवा' हाच ट्रेंड रूढ झाला आहे. राज्यकर्त्यांना, राजकीय नेत्यांना आपल्या मतदारांना नाराज करायचे नाही कारण राजकीयदृष्ट्या ते त्यांना परवडणारे नाही.

त्यामुळे सामाजिकदृष्ट्या होणा-या नुकसानीकडे पाहण्याचीच त्यांची इच्छाशक्ती नाही मग ते हे नुकसान रोखणार कसे? हा प्रश्नच! त्यामुळे दरवर्षी गणेशोत्सवापूर्वी प्रशासन व मंडळांच्या पदाधिका-यांच्या बैठका होतात व सर्व प्रकारच्या प्रदूषणास टाळण्यापासून मूर्तीच्या उंचीचे नियम पाळण्यापर्यंतची आवाहने होतात. माध्यमांमध्ये त्याच्या बातम्याही येतात. मात्र, प्रत्यक्षात कुठेच नियम पाळले जात असल्याचे पहायला मिळत नाही. सगळीकडे संवेदना हरपून बसलेल्या आणि एका वेगळ्याच नशेत हरपून सगळे नियम पायदळी तुडवणा-या समूहांचे व त्यांच्या लांगुलचालनातच आपली इतिकर्तव्यता मानणा-या स्वयंघोषित लोकनेत्यांचे दर्शनच सामान्यांना पावलोपावली होते. वाट्टेल तितका वेळ नाचा, वाट्टेल तेवढे मोठे मंडप घाला, वाट्टेल तेवढे कर्णकर्कश्श ध्वनिक्षेपक लावा, कितीही अपायकारक असल्या तरी लेझर शोच्या प्रकाशयोजना बिनधास्त करा, मूर्तीचे जलस्त्रोतांमध्ये हवे तसे विसर्जन करा, असे सांगणारे व त्यासाठी प्रसंगी भांडून प्रशासनावर दबाव आणणारे लोकनेते कसे काय असू शकतात? हा प्रश्नच! मात्र, हल्ली गणेशोत्सवासह सर्व उत्सवांमध्ये, सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये वाहवत चाललेले समूह आणि त्यांचे लांगुलचालन करण्यात मग्न स्वयंघोषित लोकनेत्यांच्या मांदियाळीचेच चित्र सर्रास पाहायला मिळते. हे सगळे उघड्या डोळ्यांनी पाहणारी विवेकी माणसेही सध्या मौनच योग्य मानतात! जे लोक बोलू पाहतात त्यांचा आवाज क्षीण करण्याचाच प्रयत्न सर्वत-हेने होतो. अशा स्थितीत 'तुमचे चुकते आहे' असे खडसावून या सगळ्यांना कोण सांगणार? असाच प्रश्न आज आहे. श्री गणराय बुद्धीचे देवता आहेत. त्यांचा उत्सव साजरा करताना ही बुद्धी, संवेदना, प्रज्ञा भक्तांमध्ये उतरावी याचसाठी आराधना होते. सध्याचे सार्वजनिक गणेशोत्सव खरेच ही आराधना करण्यासाठी आहेत का? असा प्रश्न खुद्द त्या बुद्धिदात्यालाही पडत असेल. बाप्पांना तरी हा सगळा प्रकार आवडत असेल का? हा प्रश्नही आपल्या मनात निर्माण होत नाही, हे समाजाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. लोकमान्य टिळकांनी घरातला गणपती सार्वजनिक रूपात आणताना जो उद्देश बाळगला होता त्या उद्देशाला तर आपण केव्हाच तिलांजली दिली आहे. मात्र बाप्पांच्या आगमनाचा उत्सव साजरा करताना त्यामागे जो भक्तिभाव आहे त्याचाही आपल्याला पुरता विसर पडलाय की काय? असाच प्रश्न हल्ली वारंवार निर्माण होतोय त्यामुळे आता बुद्धिदात्या श्री गणेशालाच 'आम्हाला सद्बुद्धी द्या,' असे साकडे घालण्याची व राज्यातील संस्कृतीवर, भक्तिभावावर, सामाजिक स्वास्थ्यावर निर्माण झालेले हे विकृतीचे विघ्न व संकट दूर करा, असे मागणे करण्याचीच वेळ आली आहे, हे मात्र निश्चित!

# ना.समीर काझी वक्फ बोर्डाला नवी दिशा देतील-सलीम जहाँगीर

## भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीने काझी यांचा सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

**महायुतीतील शिवसेनेच्या कोट्यातून बीड येथील समीर काझी यांची महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या अध्यक्षपदी निवड झालेली आहे. अत्यंत अभ्यासू आणि अनुभवी नेतृत्व असलेले समीर काझी हे राज्य वक्फ बोर्डाला नवी दिशा देतील असा विश्वास भाजप अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी व्यक्त केला.**

बीड येथील कार्यालयात राज्य वक्त बोर्डाचे अध्यक्ष ना समीर काझी यांचा भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर म्हणाले, नवनिर्वाचित वक्फ बोर्डचेअरमन ना. समीर काझी यांचे भाजपा अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे. समीरभाई यांचे आणि माझे कौटुंबिक नातेसंबंध असून आम्ही मित्र देखील आहोत. अभ्यासू, हुशार आणि चाणाक्ष असलेले समीरभाई नक्कीच वक्फ बोर्डाला एक नवी दिशा देतील. येणाऱ्या काळात नवीन योजना कार्यान्वित करण्याचा संकल्प त्यांनी केलेला आहे. समीर काझी हे बांधकाम क्षेत्रातील एक नावाजलेले व्यक्तिमत्त्व आहे. वक्फ बोर्डाच्या कामात यापूर्वी दिरंगाई होत होती. मात्र आता या कामांना गती मिळत आहे. कर्मचारी भरतीमुळे कामे अधिक गतीने होणार असून त्यात जास्तीत जास्त सुसूत्रता येईल. मस्जिद नोंदणीसह इतरही अनेक कामे ऑनलाईन होत असल्याने नागरीकांना होणारा त्रास कमी होणार होणार आहे. आपल्या अभ्यासू आणि अनुभवी वृत्तीचा फायदा समीर काझी यांच्या माध्यमातून त्यांच्या कामात होणार असल्याचे सलीम जहाँगीर यांनी सांगितले. यावेळी नूर लाला खान, रफिक कुरेशी,रियाज सिद्दीकी, आमु सय्यद , रविंद्र शिंगारे, सज्जाद काझी, वहिद पठाण, युनूस शेख, तकी शेख, सोयल बेग, अनीस शेख आदींची उपस्थिती होती.



**बीड : मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री बाबा सिद्दीकी आणि बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची रविवारी (दि.८) सायंकाळी भेट झाली. यावेळी बाबा सिद्दीकी यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले.**

# तलवार हातात घेऊन फिरणारा गजाआड

## बीड शहर पोलिसांची कारवाई



**बीड । प्रतिनिधी**

**धोंडीपुरा भागामध्ये एक जण तलवार घेऊन फिरत आहे अशी माहिती मिळाली होती, यानुसार सापळा रचनात आला आणि आज दिनांक ८ ९ २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास एकाला नंग्या तलवारीसह जागीच पकडण्यात आले आहे. त्याचे नाव सरफराज हबीब आलम सय्यद, वय ३२ वर्ष, राहणार बोबडे गल्ली, धोंडीपुरा, बीड अशी आहे.**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी तपासणी चालू केली असून समाजकंटकावर नियंत्रण मिळवण्यासाठी गस्त सुरू ठेवण्यात आलेली आहे. अशा गस्त दरम्यानच माहिती मिळाली होती. सामान्यजणांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारचे शस्त्र बाळगणारे किंवा समाजविघात कृत्य करणारे लोकांची माहिती आम्हा पोलिसांना ११२ क्रमांकावर किंवा बीड शहर पोलीस निरीक्षक, श्री शितलकुमार बल्लाळ यांचे मोबाईल क्रमांक ७५८८८०७७७४ यावर देण्यात यावी. सदरील कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री अविनाश बारगळ, अपर पोलिस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विश्वंभर गोलडे, पोलीस निरीक्षक श्री शितलकुमार बल्लाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री बबन राठोड, पोलीस जमादार जयसिंग वायकर, पोलीस शिपाई शहंशाह सय्यद आणि संदीप कांबळे यांनी केली आहे.

# बदामराव पंडीत यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे-परमेश्वर सातपुते



**बीड । प्रतिनिधी**

पिंपळनेर सर्कल शिवसेनेची आढाव बैठक आशापुरक गणपती मंदिर या ठिकाणी शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख तथा माजी मंत्री बदामराव आबा पंडीत व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली आज पिंपळनेर येथील आशापुरक गणपती मंदिर येथे बीड जिल्हा सह संपर्कप्रमुख तथा माजी राज्यमंत्री बदामरावजी आबा पंडित,युवा दलनेते तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी सभापती युद्धजीत दादा पंडित,शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, युवा नेते रोहीत भैय्या पंडीत,उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, यांच्या प्रमुख उपस्थितीत आज पिंपळनेर जिल्हा परिषद गटातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी लोणी व पाटेगाव येथील युवा तरूणांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला असता त्यांचे शिवसेना परिवारामध्ये स्वागत करत शुभेच्छा दिल्या व शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांना पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री करण्यासाठी आपण निष्ठेने कामाला लागावे असे सांगितले. यावेळी माझ्यासह माजी जिल्हा परिषद सभापती पंढरीनाथजी बापू लगड, युवासेनेचे सिराज सर, संजय बप्पा नरवडे ,भारत जवळकर,उमेशजी आनेराव, अध्यक्ष राजाभाऊ नरवडे, अशोकराव पटाईत, गणेश पटाईत,सप्नील सिरसट,दिपक घोडके पाटील, अजय गायकवाड, युवा नेते बाळासाहेब नागटीळक, युवा नेते विठ्ठल नांदे, युवा नेते राजेंद्र सातपुते, अच्युतराव मुंडे,गोवींद शिंदे, नाना शिंदे,अकाश गायवळ,मारोती जाधव,युवा नेते सुदर्शनजी मोरे,अश्वीन लांडे पाटील, युवा नेते कैलासराव थोटे,राजेंद्र नरवडे, प्रल्हाद इंगोले,झुंबर जाधव, काशीनाथ पवार,अली भैय्या कुरेशी,अजित कुरेशी, सिध्देश्वर नरवडे,मिनानाथ निर्मळ,रूषीराज गिरी,सोफीयान शेख ,राघुजी आण्णा सातपुते, प्रभाकरजी नांदे,रामेश्वर सातपुते सर,लक्ष्मण सातपुते, अश्विन लांडे, कैलास थोटे, गणेश नरवडे, गणेश पटाईत, काशिनाथ पवार, विठ्ठल नांदे सह पिंपळनेर सर्कल मधील शिवसेनेचे सर्व आजी माजी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १वरून...

### केंद्राकडून ९० दिवसांसाठी

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी देखील वारंवार संपर्कात होतो. केंद्र सरकारने ९० दिवसांकरिता हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अधिकचा आर्थिक लाभ मिळणार असल्याचा मला मनापासून आनंद होतो आहे, अशा भावना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केल्या आहेत.

-------------

### मी कोणाच्या नादी

इशारा मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. ते परळी वैजनाथ येथे आयोजित घोंगडी बैठकीत बोलत होते. परळी येथील हलगे गार्डन येथे घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जे जे लोक आणि नेते मराठा आरक्षणाच्या विरोधात गेले आहेत त्यांना येत्या विधानसभा निवडणुकीत हिसका दाखवणार आणि घरी बसवणार. मराठा समाजाच्या आरक्षणात राजकारण आणू नये अशी कळकळीची या राज्यकर्त्यांना विनंती आहे. फडणवीसांनी माझ्यावर सापळे रचण्यात वेळ घालवण्यापेक्षा गोरगरीब मराठा समाजाच्या घरात जाऊन बसावे आणि त्यांच्या वेदना समजून घ्याव्यात म्हणजे त्यांना समजेल की मराठा समाजाला आरक्षण कशासाठी लागते? मराठा समाजाच्या वेदना आणि अडचणी प्रचंड आहेत त्यांनी अगोदर त्या समजून घ्याव्यात. कष्ट करून लेकर शिकवायला काय संघर्ष करावा लागतो हे या निष्ठुर शासनाला कधीही कळणार नाही. मराठ्यांनी फडणवीसांनी मनमानी ऐकून घेण्यासाठी लेकरं शिकवले नाहीत. मराठ्यांचे आमदार मराठ्यांच्या लेकरांच्या मुळावर उठले आहेत. फडणवीस मराठ्यांच्या लेकरांना तडपायची वेळ आणत आहेत. आमचे लेकरे आम्ही कष्ट करून शिकवत आहोत. मराठा आणि कुणबी एक असताना शासन जाणीवपूर्वक या गोष्टी मान्य करत नाही. ज्या नोंदी सापडल्या त्याही रोखून धरण्याचे कटकारस्थान हे सरकार करीत आहे. जे राज्यकर्ते स्वतः जातीयवादी आहेत, तेच आम्हाला जातीयवाद शिकवतात याचं आश्चर्य वाटत. मराठ्यांनी मनावर घेतल तर आरक्षणाच्या विरोधातील नेत्यांना घराच्या बाहेर पडू देणार नाहीत. मात्र हा समाज माझ्याकडे पाहून गप्प बसतो आहे. मराठा समाजाच्या विरोधात गेले तर एकही आमदार महाराष्ट्रात निवडून येऊ देणार नाही. ङ्गङ्गमराठा समाज ज्यांना निवडून देतो, ज्यांना मतदान करतो, ज्यांच्या निवडून आल्यानंतर मिरवणुका काढून डिजे वर नाचतो. त्याच समाजाच्या विरोधात हे निवडून गेलेले आमदार काम करत आहेत. त्यामुळे आता इथून पुढे मराठा समाजाने समाजाचे शत्रू ओळखले पाहिजेत. त्यांना येथून पुढे दरात उभे करू नका. आपलीच लेकरे आपल्याला विचारणार आहेत. हे हरामखोरी राज्यकर्ते तुम्हाला विचारायला येणार नाहीत असे प्रखर विचार मनोज जरांगे पाटील यांनी परळी शहरातील घोंगडी बैठकीत व्यक्त केले. मी समाजासाठी पोटाला चिमटा घेऊन उपाशी मेलो आहे, या कुटील राज्यकर्त्यांना अंगावर घेतले आहे. मी यापुढेही समाजासाठी माझा जीव देईल मात्र समाज बांधवांनी या असल्या राज्यकर्त्यांच्या पाठीमागे धाऊ नका असेही ते म्हणाले.

---------

### गणेश चतुर्थीनिमित्त

सरकारतर्फे हा आनंदाचा शिधा दिला जात आहे. या आनंदाच्या शिध्यात एकूण चार वस्तू असतील. फक्त १०० रुपयांत या चारही वस्तू मिळणार आहेत. यात चणाडाळ (१ किलो), सोयाबीन तेल (१ लिटर), साखर (१ किलो), रवा (१ किलो) या चार वस्तू मिळतील.

-------------

### राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ना.अ‍ॅड.

झाली तरी मी माझ्या पांडुरंगाची साथ सोडणार नाही अशी कायम भूमिका घेणाऱ्या अ‍ॅड. सुभाष राऊत यांना त्यांच्या कष्टाचे आणि त्यागाचे फळ अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनरावजी भुजबळ, राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडवणीस, ना. अजित दादा पवार, जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून मिळाले आहे. केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील मूळ रहिवासी असलेले आणि बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभर मोठा जनसंपर्क असलेले ना. अ‍ॅड.सुभाष राऊत यांचा आज त्यांच्या मूळ गावी केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे भव्य नागरी सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी बैलगाडी मधून त्यांची संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गावातील प्रत्येक नागरिकांमध्ये हर्ष उल्हास संचारला होता. फटाक्यांची आतिषबाजी करत या मिरवणुकीने नंतर सभेचे स्वरूप प्राप्त केले. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने भव्य नागरी सत्कार संपन्न झाला. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे सुनील आबा गलांडे, माधव तात्या निर्मळ, युवा नेते विष्णू भाऊ घुले, भगवान आबा केदार, डॉ वासुदेव नेहरकर,नारायण दादा शिंदे,भगवान काळे, अरुण तात्या काळे, सरपंच सुनील देशमुख, उपसरपंच धीरज वणवे, जितेंद्र देशमुख,राम मेजर राऊत ,विजय माने, ऍड. सपाटे, सरकारी वकील ऍड.वनवे, मेजर अजिमोद्दीन शेख, चंद्रकांत खरात, संजीवनी राऊत, मालोजी गलांडे, अविनाश उगले, दादासाहेब ससाने, सचिन राऊत, सरपंच अशोक राऊत, अभिजित राऊत, रवी गायकवाड,नारायण नकाते,सचिन नेहरकर कानडी माळी सरपंच , बाळासाहेब राऊत, कपिल राऊत, मल्लारी बारगजे, विक्रम घुले , राजेंद्र बारगजे, दिगंबर मुंडे ,प्रकाशबारगजे संतोष घुले यांच्या सह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती. तसेच गावातील बहुसंख्य नागरिक मोठ्या उत्साहाने मिरवणुकीत सामील होऊन अ‍ॅड. ना. सुभाष भाऊचा भव्य असा नागरी सत्कार करण्यात आला.

-------------

### मनोज जरांगे-धनंजय

त्या ठिकाणी आले. यावेळी धनंजय मुंडे आणि मनोज जरांगे यांच्यामध्ये बरीच चर्चा झाली. मात्र चर्चा नेमकी काय झाली हे मात्र समजू शकले नाही. या भेटीमध्ये इतकी गुप्तता पाळण्यात आली होती ती या ठिकाणी कुणीही फोटो काढला नाही अथवा व्हिडिओ घेतला नाही. मात्र तिकडे दिवस उजाडला आणि या भेटीची चर्चा सुरू झाली. अर्थात मनोज जरांगे पाटील यांनी ही भेट झाली असल्याचे स्पष्ट सांगितले. मात्र अद्यापही धनंजय मुंडे यांनी अशी भेट झालीच नाही या मतावर ठाम आहेत. या भेटीचा टायमिंग सुद्धा विशेष आहे. कारण रविवारी मनोज जरांगे पाटील यांची परळीमध्ये घोंगडी बैठक होती. त्याच बैठकीच्या आधी या दोन नेत्यात गुप्त चर्चा झाल्याने चर्चेला उधाण आले आहे.

**या आधीही दोन-तीन वेळा चर्चा**

खरंतर ही भेट होण्याआधीच जरांगे पाटील आणि धनंजय मुंडे यांच्यामध्ये दोन ते तीन वेळा चर्चा झाली होती. अर्थात ही चर्चा होते मराठवाड्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीचे. धनंजय मुंडेंना मनोज जरांगे पाटील हे फोन लावत होते. मात्र धनंजय मुंडे हेसुद्धा पीक नुकसानीचे पाहणी करत असल्यामुळे त्यांच्याशी बोलणं होत नव्हतं. मात्र त्याच दिवशी धनंजय मुंडे आणि मनोज जरांगे पाटील यांच्या चर्चा झाली. ती चर्चा केवळ पीक नुकसानीची होती.

-----------

### शिरूर : ६८ गावांचा मनोज

आला आहे. पश्चिम बंगालच्या धर्तीवर मंडपातील विद्युत रोषणाई आणि आरास राहणार असून गणरायाची तेरा फुटांची भव्य इकोफ्रेंडली मूर्ती विराजमान होणार आहे. गणेश मंडळाच्या वतीने गणेश भक्तांना सांस्कृतिक मेजवानी म्हणून ऐतिहासिक देखावे दाखविण्यात येणार आहेत. सायंकाळी साडेसहा ते साडेआठ या वेळेत सदरील देखावे गणेश भक्तांना पाहता येणार असून त्यासाठी जवळपास चौदा एल.ई.डी स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानंतर शिवचरित्रकार सुशेनङ्गमहाराज नाईकवाडे यांचा शिवचरित्राचा देखील कार्यक्रम राहणार आहे. मंडळाच्या वतीने सर्व प्रकारची आवश्यक ती तयारी करण्यात आली असून शहरात ठिकठिकाणी स्वागतासाठी आकर्षक अशा कमानी लावण्यात आल्या आहेत. गणेशोत्सव काळात विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून महिलांसाठी देखील खेळ पैठणीचा उपक्रम राहणार असल्याचे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. मनोज जरांगे पाटील हे तालुक्यातील मातोरी गावचे भूमिपुत्र असल्यामुळे त्यांच्या तालुक्यात एकमेव अशा प्रकारच्या गणेश मंडळाची स्थापना व्हावी, या उद्देशाने हे मंडळ स्थापन करण्यात आले आहे. दहा दिवस गणेशोत्सव साजरा करण्यात येणार असून त्या निमित्ताने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांचा तालुक्यातील गणेश भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन जरांगे पाटील गणेश मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

**जरांगे पाटील आरतीला येणार**

गणेशोत्सव काळात आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील हे आरतीसाठी येणार असल्याचे देखील आयोजकांनी सांगितले आहे. एक दिवस सपत्नीक आरतीला उपस्थित राहून ते या कार्यक्रमाची शोभा वाढविणार आहेत

**एकमेव गणेश मंडळ**

शहरातील दहा गणेश मंडळ आणि तालुक्यातील ५८ अशा एकूण ६८ गणेश मंडळात मिळून मनोज दादा जरांगे पाटील गणपती मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासनाचा साठ गावांवरील ताण हलका झाला आहे.

------------

### गणेशोत्सवातील लोककलांवर टीका म्हणजे

अत्यंत उत्कृष्टरित्या केलेली अभिनेत्री क्रिती सेनान या दोघींची प्रमुख उपस्थिती होती. तर या उदघाटन कार्यक्रमाचे निवेदन अभिनेता संकर्षण कऱ्हाडे यांनी केले. पहिल्या दिवशी अभिनेता संकर्षण कराडे त्याचबरोबर सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, तेजा देवकर, ऋतुजा जुन्नरकर, पूनम कुडाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम झाला. या सांस्कृतिक कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद देत टाळ्या, शिट्ट्यांच्या गजरात परळीकर रसिक, प्रेक्षकांनी दाद दिली. कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा अतिशय भव्य दिव्य व नेत्र दीपक अशा पद्धतीने झाला. यावेळी धनंजय मुंडे, राजश्रीताई मुंडे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवर कलाकारांचा नाथ प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या उद्घाटिका प्रसिद्ध अभिनेत्री रश्मिका मंदांना यांनी नाथ प्रतिष्ठानच्या या कार्यक्रमाचे कौतुक करतानाच सर्वांना आपल्या स्मित हास्याने भुरळ घातली. एक स्मितहास्य आणि आपल्या भाषणाची सुरुवात कसं काय परळीकर असे मराठीतून म्हणत तिने उपस्थित प्रेक्षकांची मनी जिंकली. तर रामायणातील सीताफेमा अभिनेत्री कृती सेनान यांनी जय श्रीराम चा नारा देत गणपती बप्पा मोरया असे म्हणत नाथ प्रतिष्ठानने आयोजित केलेला हा महोत्सव सर्वांसाठी एक मेजवानीच असल्याचे म्हणत धनंजय मुंडे यांच्या भव्य आयोजनाचे कौतुक केले. यावेळी बोलताना नाथ प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय मुंडे यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षापासून नाथ प्रतिष्ठान अविरतपणे वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाच्या माध्यमातून सांस्कृतिक मेजवानी व महाराष्ट्रातील कलाकारांच्या कलेला एक भव्य दिव्य व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम करत आहे. मात्र काही लोकांच्या हे पोटात दुखत असून या कार्यक्रमावरून टीका करण्याचे काम काही जण करत आहेत. राजकारण करताना सांस्कृतिक व सामाजिक चळवळ जपण्याचे काम नाथ प्रतिष्ठानने केलेले आहे. एवढेच नाही तर प्रत्येकाच्या सुखदुःखात एक साथीदार अशी भूमिका नाथ प्रतिष्ठानने वेळोवेळीच निभावली आहे. अनेक नैसर्गिक संकटे असो सामुदायिक विवाह सोहळे असो किंवा कोरोनाचा काळ कोणत्याही कठीण प्रसंगात नाथ प्रतिष्ठान पावला पावलावर प्रत्येकाच्या सुखदुःखात एक खंबीर आधार म्हणून उभे राहिलेले आहे. काल परवाच परळी शहरात झालेल्या पूर परिस्थितीत आपण स्वतः चिखल तुडवत या कुटुंबांची भेट घेतली. पूरग्रस्तांना आवश्यक अन्न, पाणी निवारा यासह आर्थिक मदतीपर्यंतचे कामही याच नाथ प्रतिष्ठानने केलेले आहे. त्यामुळे या कार्यक्रमाचे नाव आणि निर्माण झालेली प्रतिमा याला गालबोट लावण्याचा प्रयत्न काही शक्ती जाणीवपूर्वक करत आहेत. मात्र याला न जुमानता नाथ प्रतिष्ठानचा हा उपक्रम इतर सामाजिक उपक्रमांच्या बरोबरीने अविरतपणे सुरूच राहणार असून या महोत्सवात आयोजित केले जाणारे कार्यक्रम हे सांस्कृतिक व लोककलांचा एक भाग आहे, त्यावर टीका करणे म्हणजे आपल्या संस्कृती व आलेल्या कलाकारांचा अपमान आहे असल्याचे धनंजय मुंडे यांनी ठणकावून सांगितले. यावेळी युवक नेते अजय मुंडे, नाथ प्रतिष्ठानचे कार्यवाह वाल्मिक अण्णा कराड यांसह प्रतिष्ठानचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मान्यवर नेते व पदाधिकारी यांसह आदी उपस्थित होते.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. ९ सप्टेंबर २०२४



## गणेशोत्सवानिमित्त बेलगाव येथे किर्तन, भजन, शालेय वक्तृत्व स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, विविध कार्यक्रमाचे आयोजन.

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथे सालाबाद प्रमाणे यावर्षी सुद्धा रेणुकाई गणेश मंडळाच्या वतीने गणेशाची स्थापना करण्यात आली. मागील तीस वर्षापासून हे गणेश मंडळ कार्यरत असून यंदाचे ३१ वे वर्षे आहे. यावर्षी मंडळातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १० सप्टेंबर २०२४ रोजी ह.भ .प .भागचंद महाराज झांजे यांचे सायंकाळी हरिकीर्तन ठेवण्यात आले आहे. १३ सप्टेंबर २०२४ रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा व संगीत खुर्ची स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. १४ सप्टेंबर २०२४ रोजी परिसरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. चालू शैक्षणिक वर्षांमध्ये विविध कलागुणांमध्ये विशेष नैपुण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही यावेळी आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती गणेश मंडळाचे अध्यक्ष शहाजी पोकळे सर यांनी दिली.

# सण उत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता वाढीस मदत होते -रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनीधी**

गणेशोत्सव हा सण सर्व समाज बांधवांना एकत्रित करणारा सण असून अशा उत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता वाढीस मोठी मदत होते असे प्रतिपादन भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी येथे बोलतांना केले.

जालना शहरातील मामा चौकात साहनी कॉम्प्लेक्स मध्ये श्री जालना गणेश महासंघाच्या कार्यालयाचा शुभारंभ काल शनिवारी भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. या कार्यक्रमास आ.कैलास गोरंटयाल, शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, जालना गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर, रिपाई नेते ब्रम्हानंद चव्हाण, भास्करराव दानवे, जालना गणेश फेस्टिवलचे अध्यक्ष राजेंद्र गोरे, राजेंद्र राख, राजेश राऊत, डेव्हीड घूमारे, राजेंद्र वाघमारे, सुभाषराव वाघमारे, बाला परदेशी, पारस नंद, महेश धन्नावत, सुनील खरे, शिवराज जाधव आदींची व्यासपिठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना दानवे पाटील म्हणाले की, सार्वजनिक गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी उत्सव काळात सामाजिक उपक्रम राबवून एक चांगला



संदेश तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करावा. उत्सवाच्या निमित्ताने नाचणे , गाणे हा छंद जोपासला जात असला तरी काळाची गरज लक्षात घेऊन सामाजिक उपक्रम राबविण्यावर देखील लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता असल्याचे सांगून जालना गणेश महासंघातर्फे राबविण्यात येत असलेला संविधान उद्देशिका वाचनाचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे दानवे पाटील म्हणाले. या कार्यक्रमात जालना गणेश फेस्टिवलच्या अध्यक्षपदी राजेंद्र गोरे यांची निवड झाल्याबद्दल जालना गणेश महासंघाच्या वतीने त्यांचा आणि राजेंद्र राख यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. जालना गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर यांनी कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक करतांना कार्यक्रमाची रूपरेषा आणि भूमिका विषद केली. गणेश महासंघातर्फे जालना शहरात गणेशोत्सवाच्या काळात संविधान उद्देशीका वाचनाचा उपक्रम राबविण्यात येणार असून ४०० गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांपर्यंत पोहचून संविधान उद्देशिकेचे वावन करण्यासाठी प्रोत्साहित करणार असल्याचे स्पष्ट करून जालना गणेश महासंघातर्फे महीला, युवक, युवती यांच्यासाठी गणपती अथर्व शीर्ष पठण, रांगोळी स्पर्धा, सायकल स्पर्धा, भव्य कुस्ती स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून शहरातील गणेश मंडळातील निर्माल्य दररोज संकलित करण्यासाठी जालना गणेश महासंघातर्फे स्वतंत्र ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्यात आले असून मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी या सुविधेचा वापर करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थीत प्रमुख मान्यवरांचे महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी शाल श्रीफळ व वृक्षाचे रोपटे देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगतकुमार घुगे यांनी तर शेवटी आभार महेश धन्नावत यांनी मानले. कार्यक्रमास अर्जुन गेही, विश्वनाथ क्षीरसागर, संजय आटोळे, महेंद्र देशपांडे, तुकाराम मिसाळ, अशोकराव मिसाळ, राजेश बाबरेकर, अविनाश भंडे, कैलास लोया, वासुदेव देवडे, शाम लोया, विनीत साहनी, मोहन अबोले, विजय शेंदरकर, अविनाश कव्हळे, रवी अग्रवाल, कपिल दहेकर, मोहन इंगळे, शंकरराव सवादे, दत्ता जाधव, संजय देठे, राजेंद्र जाधव, सुनील पवार, प्रकाश आचार्य, सुनील पाठक, अनिल कुलकर्णी, डॉ. प्रदीप पंडीत, डॉ. संजय मिसाळ, संजय चौधरी, दत्ता राऊत, ज्ञानेश्वर सोनवणे, प्रकाश राऊत, अनिल व्यवहारे, सोमेश काबलिये यांच्यासह जालना गणेश महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध गणेश मंडळाचे पदाधिकारी, शहरातील डॉक्टर, व्यापारी, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर आणि भक्तगण मोठया संख्येने उपस्थित होते.



**जालना : येथील चित्रकूट निवासस्थानी आज बाप्पांचे आगमन झाले. दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे प्रमाणे श्री भास्करराव पाटील दानवे यांच्या कुटुंब सह श्री गणरायाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली.**

## अपघातग्रस्त उसतोड कामगार कुटुंबाला सतीश घाटगेनी दिला आधार

घनसावंगी । प्रतिनिधी

बैलपोळा सणाच्या दिवशी बैलजोडी धूत असताना पाय घसरून बानेगाव येथील ऊसतोड कामगार शिवाजी शिंदे (वय ४८ ) यांचे गोदावरी नदीत अपघाती निधन झाले. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचा आधार हरवला. शिवाजी शिंदे यांच्या कुटुंबाला समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी आधार दिला आहे. शिंदे परिवाराची सांत्वन भेटू त्यांनी आर्थिक मदत केली असून त्यांच्याबासोबत प्रत्येक अडचणीत मदत करण्याचा शब्द सतीश घाटगे यांनी दिला आहे.

घनसावंगी तालुक्यातील बानेगाव येथील शिवाजी शिंदे व त्यांचा परिवार ऊसतोडी करतात. त्याचं कुटुंब दरवर्षी ऊसतोडी करून उदरनिर्वाह करत. ऊस तोडीसाठी घेतलेल्या बैलांना बैलपोळा सणानिमित्त गोदावरी नदीकाठी धूत असताना त्यांचा पाय घसरून गोदावरी नदीत तोल गेला. या घटनेत त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे संपूर्ण बाणेगावावर शोककळा पसरली. सर्व गावातील व्यक्तींनी हळहळ व्यक्त केली. याची माहिती गावकऱ्यांनी सतीश घाटगे यांना दिल्यानंतर या दुःखदायी परिस्थितीत शिंदे कुटुंबाला धीर देण्यासाठी सतीश घाटगे यांनी बाणेगावात जाऊन शिंदे परिवाराचे सांत्वन करून धीर दिला. तसेच त्यांना आर्थिक मदतही केली. तसेच येणाऱ्या काळातही मदतीची गरज लागल्यास संपर्क करण्याचे शिंदे कुटुंबातील सदस्यांना सांगितले. यावेळी गावकरी उपस्थित होते.

## पाटोदा पोलीस गणेशोत्सव बंदोबस्तासाठी सज्ज-पोलीस निरिक्षक मजहर अली सय्यद

पाटोदा । प्रतिनिधी

पोलीस स्टेशन पाटोदा अंतर्गत एकूण ३२ गणेश मंडळाची स्थापना झालेली आहे. त्यापैकी प्रॉपर पाटोदा शहरांमध्ये १३ गणेश मंडळाची व ग्रामीण भागात १९ गणेश मंडळाची स्थापना झालेली आहे. एक गाव एक गणपती-१५ ठिकाणी स्थापन करण्यात आलेले आहेत.

पोलीस स्टेशन हद्दीतील गणेश मंडळांना पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री मजहर अली सय्यद हे स्वतः भेटी देत आहेत. गणेश उत्सव शांततेत व आनंदात साजरा व्हावे गणेश मंडळांना व पाटोदा शहरातील जनतेला



गणेशोत्सव मिरवणुकीचा आनंद सुरक्षित रित्या घेता यावा याकरिता. पाटोदा पोलीस स्टेशन तर्फे योग्य बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले असून पोलीस स्टेशन पाटोदा येथील व बाहेरील पोलीस बंदोबस्त लावण्यात येणार आहे. पाटोदा पोलीस स्टेशन तर्फे सर्व गणेश मंडळे आणि जनतेस गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा..

## जयभवानी गणेश मंडळाचे कोळी नृत्य पाहण्यासाठी मंठेकरांची तुफान गर्दी

**मंठा । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे संस्थापक असलेल्या मंठा येथील जयभवानी गणेश मंडळाने गणेशोत्सव काळातील सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमाची ३८ वर्षाची परंपरा जोपासली आहे. यावर्षी सुद्धा जयभवानी गणेश मंडळाच्या गणरायाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. छत्रपती संभाजी राजे चौकातून श्री गणरायाची मिरवणूक काढण्यात आली. श्रीरामपूर येथील सनई चौघडा वाद्य आणि शहापूर येथील ढोल बाजा कोळी नृत्य पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या मिरवणुकीत राजकीय पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, नगरसेवक, गणेश मंडळाचे सर्व पदाधिकारी सहभागी झाले होते. तालुक्यातील पत्रकार आणि प्रमुख मान्यवरांच्या हस्ते श्रींची स्थापना करून आरती करण्यात आली. जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी मुहूर्तमेढ रोवलेल्या मंठा जयभवानी गणेश मंडळाने सातत्य ठेवल्यामुळे या मंडळांने जिल्ह्यात नावलौकिक मिळविला आहे. जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी गणेश मंडळाचे अध्यक्ष म्हणून शिवसेना शहरप्रमुख वैजनाथ बोराडे व सर्व पदाधिकाऱ्यांच्या कल्पक संकल्पनेतून गणेश मंडळाने श्री केदारेश्वर मंदिराची भव्य सजावट केली आली आहे. मागील ३८ वर्षाच्या कालखंडामध्ये गणेश मंडळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनावरील देखावे, व्यसनमुक्ती वर आधारित कार्यक्रम, महाराष्ट्रातील



प्रख्यात नामवंत कीर्तनकारांचे कीर्तनाचे प्रबोधनात्मक कार्यक्रम, राष्ट्रीय एकात्मता, हुंडाबंदी, सर्वधर्मसमभाव यावरील देखावे, धार्मिक देखावे, महिला जनजागृतीवर आधारित कार्यक्रम आदी कार्यक्रमाच्या माध्यमातून जयभवानी गणेश मंडळ हे नाव नावारूपाला आणले. या गणेश मंडळाला अनेक ठिकाणी विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे. विशेष म्हणजे या गणेश मंडळांने प्रत्येक गणेश विसर्जन मिरवणुकीत वेगवेगळे पथक आणून मंठेकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. यामध्ये प्रामुख्याने मुंबई येथील शिवतांडव, कोल्हापूर, मुंबई, पुणे येथील १०० युवतींचे ढोल पथक, दांडपट्टा, तलवारबाजी, घोडेस्वारी, लेझीम पथक, हलगी पथक, पारंपरिक सनई वाद्य, बाहुबली हनुमान या माध्यमातून गणेश भक्तांचे मनोरंजन केले. दरवर्षी वेगवेगळ्या पद्धतीने आकर्षक मंदिराची प्रतिकृती उभारली जाते. सजावट आणि विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी नागरिक मोठी गर्दी करतात. तसेच रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिराच्या माध्यमातूनही जयभवानी गणेश मंडळाने आपले सामाजिक कार्य सुरू ठेवले. यावर्षी गणेशोत्सव उत्साहामध्ये साजरा करण्यासाठी जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली जयभवानी गणेश मंडळाचे अध्यक्ष शहरप्रमुख वैजनाथ बोराडे, कार्याध्यक्ष विकास सूर्यवंशी, कोषाध्यक्ष पप्पू दायमा, उपाध्यक्ष गोपी गायकवाड, विकास घनवट, माजी अध्यक्ष बाजीराव बोराडे, सचिव शरद मोरे, युनूस कुरेशी, सहसचिव अशोक अवचार, नाना बोराडे शिवसेनेचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# आपल्या नशिबात जे आहे त्या गोष्टीला कोणीच हिरावून घेऊ शकत नाही - स्वाध्यायी ज्योती शिंगी

**माजलगाव । प्रतिनिधी**

आपल्या नशिबात जी गोष्ट आहे त्या गोष्टीला कोणीही कितीही प्रयत्न केले तरी कुठल्याच पद्धतीने हिरावुन घेऊ शकत नाही असे प्रतिपादन स्वाध्यायी ज्योती शिंगी यांनी माजलगाव येथे केले. जैन चातुर्मासातील पवित्र असे ८ दिवस म्हणजे पर्युषण पर्व. या पर्युषण पर्वाच्या निमित्ताने स्वाध्यायी भवन अहमदनगर येथून नेवासा येथील ज्योती शिंगी, कोमल संचेती व भगवती कोल्हार येथून जयश्री राका यांना जैन धर्माचे आगमवाचन व ज्ञान, ध्यान प्रसारित करण्यासाठी माजलगाव येथील वर्धमान जैन स्थानक येथे पाठवले होते. त्यानिमित्ताने मागील ८ दिवसांत नेवासा येथील स्वाध्यायी ज्योती शिंगी यांनी जीवन जगण्याचे विविध असे सात सूत्र सांगितले ज्या सूत्रांनी आपल्या जगण्याचे सार्थक होईल असे ज्ञान त्यांनी







उपस्थितांना दिले. यावेळी त्यांनी सांगितले की, आपला समजूतदारपणा आपल्या जवळच ठेवावा, बाहेर झालेला क्रोध, तणाव किंवा भांडणे घरात कधीच सोबत आणू नये, प्रत्येक वेळी आपली दुसऱ्यांच्या प्रती गुणात्मक दृष्टी असायला हवी, जगताना ज्ञान, ध्यान आणि धर्म कायम अंगीकृत करून जगावे, जीवन जगताना कुठलाही गर्विष्ठपणा न ठेवता सर्वांशी मनोमिलन करून राहावे आणि प्रत्येक गोष्टीबद्दल आपल्या मनात सकारात्मक विचार असायला पाहिजे. या सर्व सूत्रांचे जर जीवनात अनुसरण केले तर आपल्या जीवन जगण्याचे सार्थक होईल व आपल्याला मोक्षप्राप्ती मिळेल असे स्वाध्यायी ज्योती शिंगी यांनी सांगितले. या पर्युषण पर्वाच्या निमीत्ताने स्वाध्यायी यांनी विविध ज्ञानोपासक खेळ, छोटे नाटक घेऊन त्यांच्या कलात्मक रचनेने समाजातील महिला व पुरुषांना मोलाचे ज्ञान दिले.

तर काल रविवार दि.८ सप्टेंबर रोजी वर्धमान जैन स्थानक येथे 'जैन संवत्सरी' या महापर्वाने पर्युषण पर्वाची सांगता झाली. यावेळी सिद्धता नवल पगारिया हिने ९ दिवस निरंकार उपवास केल्याबद्दल तिचे अनुमोदन करण्यात आले. त्याचबरोबर किरण तातेड, लब्धी लोढा, धीरज खारीया, कोमल खारीया, स्नेहा लोढा याचबरोबर भरपूर जणांनी १ दिवस, ३ दिवस, ५ दिवस असे विविध निरंकार उपवास केले यांचेही अनुमोदन यावेळी करण्यात आले. यावेळी समाजातील महिला, पुरुष, जेष्ठ, युवा व लहान मुलांची भरपूर उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### गोविंद इतापे यांच्यासह

संतोष वाघमारे, नाना पोळ, माऊली धुमाळ,दीपक सटाले,शिवाजी तांदळे, मेघराज नावडकर, मधुकरराव लोंढे, शिवाजी पवार, गजानन जाधव, गोपाल भंडारी, कृष्णा चौधरी, अर्जुन काकडे, अशोक जाधव, हबीब शेख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमाप्रसंगी संतोषराव यादव, माजी नगराध्यक्ष नानाभाऊ शिंदे, मा.नगरसेवक राम जगताप, शरदराव यादव, ईश्वर होके,जगदीशराव बादाडे,हनुमंतराव बादाडे, विलास महाराज बादाडे,राजेभाऊ वापटे,संभाजी नाईकनवरे,बप्पा देशमुख,प्रकाश चव्हाण,सिद्धेश्वर डाके, सरपंच अविनाश गोंडे, भालचंद्र सोळंके, मारोती विटेकर सर,राजूभाई सय्यद,रामेश्वर पठाडे, शाहेद भाई पठाण,सदाशिव रोडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### अल्पसंख्याक समाजातील

विधाते माजी सभापती नगरपरिषद बीड तथा जयदत्तजी आण्णा क्षीरसागर विचारमंच महीला आघाडी विधानसभा प्रमुख, अ‍ॅड. जेबा कादीर पोलीस हक्क संघर्ष समिती, प्रा. संगीता शिंदे, पत्रकार अशोक होळकर यांची उपस्थिती लाभली होती.

कार्यक्रमाचे आयोजक शेख मुख्तार यांच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला, संस्थेच्या संचालिका उम्मे हनी यांच्या प्रास्ताविकांने कार्यक्रमाची सुरुवात तर रफीकसर यांच्या आभारप्रदर्शने सांगता झाली. यावेळी बीड शहरासह जिल्ह्यातुनच नव्हेतर मुंबई -पुणे- औरंगाबाद- लातूर या शहरातुन यशस्वी प्रशिक्षणार्थी विद्यार्थी पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### मराठवाडा साहित्य परिषद

१० वाजेपासून मतमोजणीस सुरवात होऊन निकालीची घोषणाही त्याच दिवशी करण्यात येईल असे मराठवाडा साहित्य परिषद निर्वाचन अधिकारी डॉ.राम चव्हाण यांनी कळविल्याची माहिती मराठवाडा साहित्य परिषद शिरूर कासार चे उपाध्यक्ष तथा एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड यांनी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलतांना दिली.

### जी माणसे माणसासोबत उचित

माणूस असाल तर माणसा सारखे वागा केवळ माणसासारखे दिसणे दिसणे अपेक्षित नाही. माणसाने जनावरासारखे वर्तन करू नये. असे दुर्गुण नष्ट करून माणसाने माणसासोबत असलेल माणुसकीचे नाते जपणे गरजेचे आहे.आणि हीच बुद्ध धम्माची खरी शिकवण आहे. माणसातील पशुत्व नाहीसे करणारे औषध म्हणजे बुद्ध धम्म होय. आजच्या पूजेचे यजमान लताताई मथुरादास बनसोडे आणि ज्योतीताई तेजसकुमार बनसोडे त्यांच्या वतीने उपस्थितांना भोजनदान देण्यात आले. प्रसंगी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक कणके यांचा सपत्नीक तर, सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे शिवाजी धाईजे, वसंतराव जावळे, माजी नगरसेवक सचिन डोंगरे, माजी जि .प . समाज कल्याण सभापती गयाताई आव्हाड,वंचित आघाडीचे धम्मानंद साळवे,अंकुश जाधव,पूजेचे यजमान बनसोडे परिवार यांचा सद्? धम्म सेवा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऍड दशरथ मकसरे यांनी केले तर,आभार सदाशिव भालेराव यांनी मानले.या वेळी सद्? धम्म सेवा संघाचे अरुण नाकलगावकर, श्यामराव वाघमारे, भगवानराव सातपुते, पांडुरंग जाधव, रविकांत उघडे, सोपानराव उजगरे, एम.बी.चांदमारे,जी एन घनगाव, वाल्हाबाई टाकणखार, लिलाबाई उजगरे, हे उपस्थित होते. तर राजश्री शाहू शिक्षक पथसंस्थेचे अध्यक्ष कपिल डोंगरे, मनीषा सिद्धार्थ ढवळे, शांताबाई साळवे, सुशीलाताई चांदमारे, पुनमताई धाईजे,दीपक भालेराव,बबनराव खोपे,विलास साळवे,राजरत्न खळगे,मनोरमाताई सोनवणे,आशाताई शिरसट, लक्ष्मणराव बनसोडे, गोविंदराव टाकणखार,नवनाथ गायकवाड, प्रा.संजय बागुल,अनिताताई वाघमारे,मीरा वाघमारे,कमलबाई श्रीमंतराव डोंगरे,सुधामती जावळे,इत्यादी बौद्ध उपासक उपासिका माजलगाव शहर आणि ग्रामीण भागातून या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

### गणपती बप्पा मोरयाच्या

शहरातील विविध गणेश मंडळांनी आकर्षक आरास तयार करण्याचा संकल्प केला असून ते त्या दृष्टीने तयारीला लागले आहेत. विशेषतः धार्मिक कार्यक्रमावर आधारीत देखावे तयार केले जाणार आहेत. त्याच बरोबर सामाजिक उपक्रमही या अनुषंगाने तयार केले जाणार आहेत. विविध गणेश मंडळांनी दहा दिवस भरगच्च कार्यक्रमाची मेजवाणी अंबाजोगाईकरांना देण्याचे ठरविले आहे. त्यानुसार कार्यक्रमाची रूपरेषा ही ठरवली गेली आहे. शनिवारी बप्पांचे आगमन मिरवणूकीने झाले. या मिरवणूकीत मोठ्यांपासुन ते लहान मुलांचा सहभागी पहावयास मिळाला.

### सोयाबीन व कापूस हमीभावाने

हमीभावाचे परिपत्रक काढावे. असे नमूद केले आहे. निवेदनासोबत सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती हमी भावाचे परिपत्रक जोडले आहे. सदरील निवेदनाची प्रत उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना देण्यात आली आहे.

सर्व पिकांच्या हमीभावाचे परिपत्रक काढा :

राज्यासह बीड जिल्ह्यातील शेतकरी आधीच नैसर्गिक आपत्तीने त्रस्त आहे. त्यात सरकार, प्रशासन आणि खासगी व्यापारी हे शेतकऱ्यांना हमीभाव न देता लुट करीत आहेत. त्यामुळे केंद्र शासनाने सन २०२४ - २०२५ या वर्षासाठी जाहीर केल्याप्रमाणे सर्व पिकांच्या हमीभावाचे परिपत्रक काढावे. जे व्यापारी सोयाबीन व कापूस हमीभावापेक्षा कमी भावाने खरेदी करीत आहेत. त्यांचे परवाने तात्काळ रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने राज्य सरकार, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या विरोधात संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ऍड.मनोजदादा आखरे व महासचिव सौरभदादा खेडेकर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

- प्रविण ठोंबरे, (जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, बीड.)

cmyk

# बासमतीची निर्यात १५% ने वाढली



भारतातून परदेशात बासमती तांदळाची मागणी सध्या प्रचंड वाढली आहे. सौदी अरेबिया, इराण, इराक आणि अमेरिकेत भारताच्या तांदळाला मोठी मागणी वाढली असून एप्रिल ते जुलैमध्ये बासमतीच्या निर्यातीत १५ टक्क्यांची वाढ झाली आहे. गेल्या वर्षी बासमती तांदळाची निर्यात साधारण १.७७४ अब्ज एवढी होती. भारत हा जगातील बासमती तांदळाचा मोठा उत्पादक आहे. २०२३-३४ वर्षात भारतानं ५.८३ अब्जाहून अधिक किमतीचा सुगंधी तांदूळ निर्यात केला. ज्यापैकी दोन तृतीयांशाहून अधिक तांदूळ पश्चिम आशियामध्ये निर्यात झाला. द बिझनेस लाइनच्या अहवालानुसार, जर आपण निर्यातीच्या प्रमाणाबाबत बोललो तर, भारताने यावर्षी एप्रिल-जुलै दरम्यान १९.१७ लाख टन बासमती तांदळाची निर्यात केली आहे, तर वर्षभरापूर्वी याच कालावधीत १६.०९ लाख टन निर्यात झाली होती. म्हणजेच गतवर्षीच्या तुलनेत यंदा प्रमाणानुसार १९ टक्क्याने निर्यात वाढली आहे.

कोणत्या देशात निर्यात वाढली?

एप्रिल ते जुलैमध्ये सौदी अरेबीयाला ३,८१ लाख टन बासमतीची निर्यात करण्यात आली होती. तर वर्षभरापूर्वी हा आकडा ३.०३ लाख टन एवढा होता. ही निर्यात १९ टक्क्यांनी वाढली असून इराणमध्येही मागणी वाढल्यानं निर्यातीत वाढ झाल्याचे सांगण्यात आले.


अमेरिकेत बासमतीची निर्यात ४२ टक्क्यांनी वाढली.

भारतातून अमेरिकेला बासमती तांदळाची निर्यात तब्बल ४२ टक्क्यांनी वाढली आहे. यंदा भारतानं ९०,५६७ टन निर्यात केली असून मागच्या वर्षी ही निर्यात ६३७०० टन होती. अमेरिकेत सध्या सुगंधी बासमती तांदळाला मोठी मागणी असून मागील वर्षाच्या तुलनेत ४२ टक्क्यांनी निर्यात वाढली आहे. सौदी अरेबिया, इराण, इराक आणि युनायटेड स्टेट्स सारख्या देशांच्या मागणीनुसार चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल-जुलै कालावधीत भारताच्या बासमती तांदळाची निर्यात जवळपास १५ टक्क्यांनी वाढून २.०३६ अब्ज झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत बासमतीची निर्यात १.७७४ अब्ज होती.

इराणमध्ये बासमतीला प्रचंड मागणी

इराणने आपल्या देशांतर्गत उत्पादकांना पाठिंबा देण्यासाठी बासमती तांदळाच्या आयातीवर तीन महिन्यांची बंदी घातली आहे. ऑक्टोबर अखेरपर्यंत आयात बंदी कायम राहण्याची शक्यता आहे आणि नोव्हेंबरमध्ये शिपमेंट पुन्हा सुरू होऊ शकते. त्याच वेळी, बासमती निर्यातीसाठी इराक हे तिसरे सर्वात मोठे निर्यातस्थळ म्हणून उदयास आले आहे. येथे निर्यातीचे प्रमाण २५ टक्क्यांनी वाढून २.८१ लाख टन झाले आहे. मात्र, वर्षभरापूर्वी याच काळात त्याचे प्रमाण २.२४ लाख टन होते.

# शेळ्या मेंढ्यांना होणारा निळी जीभ आजार



जनावरांना होणारा निळी जीभ आजार प्रामुख्याने विशेषतः ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात होतो. हा रोग मुख्यतः शेळ्या आणि मेंढ्यांना होतो, गुरेढोरे फार क्वचितच या आजाराने प्रभावित होतात. विषाणूमुळे होणारा हा रोग संसर्गजन्य नसला तरी एक वर्षाच्या वयोगटातील कोवळ्या शेळ्या मेंढ्यांना या रोगाचा धोका असतो. दूध पिणारी कोकरू तुलनेने या रोगास प्रतिरोधक असतात. जाणून घेऊ या आजाराची कारणे, लक्षणे आणि त्यावत उपाय.

निळी जीभ आजाराची कारणे : ओरबीव्हायरस नावाच्या विषाणूमुळे हा रोग होतो. पावसाळ्यातील रक्त शोषणाऱ्या कीटकापासून या रोगाचे विषाणू पसरतात. डासामार्फत सुद्धा या रोगाचा प्रसार होतो. वीर्य आणि प्लेसेंटल मार्गाद्वारे सुद्धा संक्रमण होऊ शकते. निळी जीभ आजाराची लक्षणे : या आजारात जनावरांना ताप येतो, नाकातून स्त्राव येऊन नाक लाल होते, सुजते. तोंडातून लाळ येऊन जीभ काळी- निळी पडते. खुरांना सूज येते व ते लंगडायला लागतात. दुर्गंधीयुक्त अतिसार होऊन जनावरे मलूल होतात. जनावरांना श्वास घ्यायला त्रास होतो, ते घोरतात. श्वसनक्रिया बंद पडल्यास मृत्यू सुद्धा होऊ शकतो.

आजारावर प्रथमोपचार व उपचार : सर्वात प्रथम आजारी जनावरांना वेगळे करावे व त्यांना सूर्यप्रकाशापासून दूर ठेवावे. बाधित जनावरांना पुरेशी विश्रांती द्यावी, चरायला पाठवू नये. बाधित जनावरांना तांदूळ, नाचणी, यांची लापशी खाऊ घालावी. जनावरांच्या व्रणावर/अल्सरवर ग्लिसरीन लावावे. तोंडातील अल्सरवर खारट पाण्याने उपचार केले जाऊ शकतात किंवा १ ग्रॅम पोटॅशियम परमँगनेट १ लिटर पाण्यात मिसळून दिवसातून २ ते ३ वेळा या द्रावणाने तोंड धुवावे. बाधित मेंढ्यांना प्रतिजैविक देण्यासाठी किंवा लक्षणात्मक उपचारांबाबत पुढील सल्ल्यासाठी तुमच्या जवळच्या पशुवैद्यकीय डॉक्टरांशी संपर्क साधावा.

प्रतिबंधात्मक उपाय : नियमित अंतराने जनावरांचे योग्य लसीकरण करावे. रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या भागातून जनावरांची आयात टाळावी.

# किडनाशक फवारणी करताना कोणती खबरदारी घ्याल?


सध्याचा काळ हा खरीप पिकांवर विविध किड रोग येण्याचा काळ आहे. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी किड, रोग नियंत्रणासाठी फवारणीची कामे सुरु आहेत. ही किटकनाशके अत्यंत विषारी असल्यामुळे त्यांची फवारणी नीट काळजी घेऊन करावी लागते. थोडी जरी कसूर झाली तर त्याची मोठी किंमत चुकवावी लागते. पण तरिही काही शेतकरी कीटकनाशक खरेदी करताना आणि फवारताना खबरदारी घेत नाहीत. त्यामुळे मोठे अपघात घडतात. अस होऊ नये म्हणून कीटकनाशक खरेदी करताना आणि फवारताना काय काळजी घ्यायची याबद्दल डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने दिलेली माहिती पाहुया.

किटकनाशके खरेदी करताना परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करा. खरेदी करतेवेळी बॅच क्रमांक, नोंदणी क्रमांक, लेबलवरिल उत्पादन तारीख, एक्सपायर तारीख नक्की तपासा. बील घेतेवेळी त्यावर सर्व तपशील आहे का? याची खात्री करा. किटकनाशक खरेदी करताना किडीची नीट ओळख असण गरजेच आहे. त्यासाठी किडीसाठी शिफारस केलेल्या कीटकनाशकाचीच खरेदी करा. विविध किडीसाठी शिफारस असलेल्या किटकनाशकाची माहिती तुम्हाला या वेबसाईटला मिळेल. किंवा तुमच्या विभागातील कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रातील तज्ञांची मदत घ्या. किटकनाशके वापरण्यापुर्वी सोबत दिलेले माहिती पत्रक वाचून त्यात दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करा. आणि माहितीपत्रक व बील नीट जपून ठेवा.

ही झाली किटकनाशक खरेदी करताना घ्यायची काळजी आता पाहुया फावारणी करताना काय काळजी घ्यायची ते. फवारणीसाठी मिश्रण तयार करताना किटकनाशकाची शिफारशीनूसार मात्रा मोजपात्राने मोजून घ्या. दाणेदार किटकनाशके काढण्यासाठी. लांब दांडीच्या चमचाचा वापर करा. सुरुवातीला एका बकेटमध्ये पाणी घेऊन त्यामध्ये मोजलेले कीटकनाशक टाकून लाकडी काठीने ढवळाव. अस एकजीव केलेल मिश्रण हळूवार पंपातील मोजलेल्या पाण्यात टाकून ढवळून घ्याव आणि त्यानंतरच फवारणी करावी. फवारणी करताना संरक्षणात्मक किटचा वापर करावा, यामध्ये हातमोजे, टोपी, गॉगल, जॅकेट, मास्क आणि पायात बुट असण गरजेच आहे. कारण अनेक शेतकरी अशी कोणतीही खबरदारी न घेता डायरेक्ट फवारणीचा पंप हातात घेतात. असं केल्यामुळे वाऱ्यामुळे कीटकनाशक नाकातोंडात जाऊन विषबाधा होऊ शकते. याशिवाय शरिरावर जखम असलेल्या व्यक्तींनी फवारणी करु नये. गळके फवारणी पंप वापरु नका. तणनाशके आणि किडनाशके फवारण्याचा पंप वेगवेगळा असावा. फवारणी पंपाच्या नोझल मध्ये अडकलेला कचरा तोंडाने फुंकून साफ करु नये. त्याऐवजी खराब झालेला टुथब्रश किंवा बारीक तार वापरावी. फवारणी करताना खाद्यपदार्थ खाणं किंवा धुम्रपान करु नका. पिक फुलोऱ्यात असताना किटकनाशकाची फवारणी करु नका त्यामुळे मित्रकिटकांच संरक्षण होईल. फवारणी झाल्यानंतर विशिष्ट काळापर्यंत फळे भाज्या खाण्यासाठी वापरु नका. याशिवाय फवारणी झालेल्या ठिकाणी जनावरांना चरण्यासाठी सोडू नका. फवारणी झाल्यानंतर रिकामे डबे धुऊन वापरु नका. ते काठीने ठेचून जमिनीत गाडावेत. उरलेली किटकनाशके कुलूपबंद ठिकाणी ठेवावीत. फवारणी झाल्यानंतर आंघोळ करावी आणि कपडे स्वच्छ धुवावेत. अशा प्रकारे फवारणी करताना काळजी घेतल्यास विषबाधे सारखे प्रकार घडणार नाहीत.



# ग्रीनिंग रोग, सिट्रस सायला किडीचे व्यवस्थापन



सिट्रस ग्रीनिंग : सद्यःस्थितीत ग्रीनिंग किंवा मंद ऱ्हास हा रोग संत्रा, मोसंबी, लिंबू अशा लिंबूवर्गीय फळपिकातील सर्वात महत्त्वाचा आणि विनाशकारी रोग आहे. त्याचा प्रसार मराठवाडा व विदर्भामध्ये वाढत चालला आहे. भारतात १९६० च्या दशकात प्रथम नोंद झालेल्या या रोगामुळे लिंबूवर्गीय फळझाडे कमजोर होतात. फांदी मर व ऱ्हास होतो. हा रोग कंडीडेट्?स लीबेरीबॅक्टर एशियाटीकस या जिवाणूमुळे होतो. एकदा जिवाणूचा शिरकाव झाडामध्ये झाल्यानंतर झाड जिवंत असेपर्यंत तो सक्रिय राहतो. तो झाडातील अन्नपुरवठा करणाऱ्या उतीमध्ये राहतो.

ग्रीनिंग रोगाची लक्षणे : जिवाणूचा संसर्ग झाल्यानंतर पानांच्या शिरामधील भाग पिवळा होण्यास सुरुवात होते. पिवळेपणा मध्य शिरेच्या दोन्ही बाजूंस समान नसतो. पाने शेवटी पिवळी पडतात. यापैकी बऱ्याच पानांवर अनेक हिरवे ठिपके आढळून येतात. रोगग्रस्त झाडावरील पानावर चट्टे दिसतात. पानावर इंग्रजीतील 'व्ही' आकाराच्या खाचा तयार होतात. पानांच्या खालच्या बाजूवरील शिरा फुगतात. शिरामधील पानांचा भाग पिवळा पडतो. कालांतराने रोगग्रस्त पाने फांद्यांच्या शेंड्याकडून गळण्यास सुरुवात होते. रोगाचा प्रादुर्भाव झाल्यापासून ३ ते ४ वर्षांत झाडाचा ऱ्हास होतो. रोगग्रस्त झाडास येणारी फळे आकाराने लहान राहतात. त्यांची वाढ असमतोल होते. फळाच्या आतील बिया सुरकुतलेल्या असतात. किंवा फळे बीजविरहित असतात. फळांच्या रसाची चव कडू होते. रोगग्रस्त फळांचा देठाकडील भाग पिवळा नारंगी होऊन खालील भाग अत्याधिक हिरवा होतो.

रोगाचा प्रसार : नवीन कलम तयार करतेवेळी संसर्गग्रस्त बडवूड (कांडी)पासून पसरतो. ग्रीनिंगग्रस्त मातृवृक्षाचे डोळे कलम तयार करण्यासाठी वापरले गेल्यास होतो. रोगग्रस्त झाडापासून डोळे काढण्यासाठी वापरलेल्या अवजारामुळेही रोगाचा प्रसार होतो. बागेमध्ये सिट्रस सायला (शा. नाव - डायफोरनियाना सिट्री) या किडीमुळे या रोगाच्या प्रसारास मदत होते.

नियंत्रणासाठी : रोगमुक्त रोपांची लागवड, लागवड सामग्रीची खात्री करणे, सिट्रस सायला नियंत्रण, पोषक घटकांचा पुरेपूर वापर आणि योग्य पाणी व्यवस्थापन याच रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपलब्ध उपाययोजना आहेत.

सिट्रस सायला : (शा. नाव - डायफोरनियाना सिट्री) संत्रावर्गीय झाडावर येणारी महत्त्वाची कीड. झाडावर नवती, बहर फुटायला सुरुवात होताच प्रादुर्भावास सुरुवात. जून, जुलैमधील मृग बहर आणि फेब्रुवारी, मार्चमधील आंबिया बहरावर प्रादुर्भाव जास्त असतो.

ओळख : या किडीचा प्रौढ पिवळसर करड्या रंगाचा असून, पंखांच्या विशिष्ट रचनेमुळे त्याचा मागील भाग उंचावल्यासारखा दिसतो. पिले मळकट रंगाची असतात. या किडींची पिले कोवळी पाने व फांद्या यातून रसशोषण करतात. त्यामुळे कोवळी पाने व कळ्यांची गळ होते. प्रादुर्भाव झालेल्या झाडावर बारीक साखरेसारखा पदार्थ दिसणे. ही या किडीचा प्रादुर्भाव झाल्याची ओळख आहे. त्याचा उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो.

नुकसान : पूर्ण वाढ झालेले कीटक व पिले हा कोवळी पाने, नवती, कळ्या, फुले, बारीक कोवळ्या फांद्यातून रस शोषतात. बारीक नवती व कळ्यांची भारी गळ होते. फळ धारणेवर विपरीत परिणाम होतो. नवतीची थोडी मोठी पाने वाकडी तिकडी चुरगळल्यासारखी दिसतात. पिलांच्या शरीरातून स्रवलेल्या साखरेसारख्या चिकट पदार्थांवर काळी बुरशी वाढते. परिणामी, अन्ननिर्मिती प्रक्रियेमध्ये बाधा येते. अधिक प्रादुर्भावामध्ये शेंड्याकडील लहान फांद्यासुद्धा वाळतात. अशा फांद्यावर बहरावेळी फलधारणा होत नाही. या किडीमुळे ग्रीनिंग रोगाचा प्रसार होतो. नवती आल्यावर व पाण्याचा खंड पडल्यास प्रादुर्भाव जास्त वाढतो. अशा वेळी सतर्क राहून त्वरित फवारणी करावी.व्यवस्थापन : झाडावर भरपूर पालवी राहावी, यासाठी अन्नद्रव्याचा शिफारशीनुसार वापर करावा. सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता आढळून आल्यास त्वरित पुरवठा करावा. रोगमुक्त मातृवृक्षापासून कलम कांडी निवडाव्यात. रोगमुक्त प्रमाणित कलमांचाच लागवडीसाठी वापर करावा. एखाद्या फांदीमध्ये ग्रीनिंगची लक्षणे दिसल्यास तेवढीच फांदी तत्काळ कापून नष्ट करावी. अधिक प्रमाणात प्रकोप असल्यास बाधित झाडे मुळासकट उपटून, जाळून नष्ट करावीत. फांद्याच्या कापणीसाठी वापरली जाणारे अवजारे सोडिअम हायपोक्लोराइट (१ टक्का) द्रावणाने निर्जंतुक करावीत. सिट्रस सायला या किडीच्या नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे (३० बाय ४० सेंमी आकाराच्या फोमशीटपासून बनविलेले घरगुती किंवा तत्सम आकाराचे बाजारात उपलब्ध) ३० ते ४० प्रति एकर लावावे. हे चिकट सापळे फेब्रुवारी ते नोव्हेंबर दरम्यान लावावे. ढालकिडा, क्रायसोपा, सिरफीड माशी, टॅमरॅक्सिया रॅडीयाटा इ. मित्र कीटकांचे संवर्धन करावे. पर्यायी खाद्य वनस्पती (कढीपत्ता) मोसंबीच्या बागेमध्ये किंवा आजूबाजूस असू नये. कारण ही झाडे सायला किडीचे खाद्य असून, प्रजाननाचे फार मोठे स्रोत ठरू शकतात. सिट्रस सायला या किडीच्या नियंत्रणासाठी, फवारणी प्रति १० लिटर पाणी थायामेथोक्झाम (२५ डब्ल्यूजी) १ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड (१७.८ टक्के एसएल) १ मि.लि. गरज भासल्यास १५ दिवसांच्या अंतराने कीटकनाशक बदलून दुसरी फवारणी करावी.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१५४३ : नऊ महिने वयाची मेरी स्टुअर्ट ही स्कॉटलंडची राणी बनली.
१७७६ : अमेरीकेतोल कॉन्टिनेंटल काँग्रेसने ''औपचारिकरित्या 'सयुक्त वसाहती' हे नाव बदलून ''युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका'' असे ठेवले.
१७९१ : वॉशिंग्टन डी.सी हे शहर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या नावावर ठेवण्यात आले.
१८३९ : जॉन हर्षेल याने जगातील पहिले छायाचित्र काचेच्या पट्टीवर घेतले.
१८५० : कॅलिफोर्निया हे अमेरिकेचे ३१ वे राज्य बनले.
१९२० : साली अलीगढ येथील एंग्लो ओरिएंटल महाविद्यालयाचे रुपांतर मुस्लिम विश्वविद्यालयात झाले.
१९३९ : मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमामधे 'प्रभात'चा 'माणूस' हा चित्रपट प्रदर्शित झाला. फिल्म जर्नलिस्टस असोसिएशनने १९३९ सालातील सर्वोत्कृष्ट चित्रपट असा बहुमान त्याला दिला.
१९४५ : दुसरे चीन जपान युद्ध जपानने चीनसमोर शरणागती पत्करली.
१९९० : श्रीलंकन सैन्याने बट्टिकलोआ येथे १८४ तामिळींची हत्या केली.
१९९१ : ताजिकिस्तानने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.
१९९७ : सात वेळा राष्ट्रीय विजेतेपद मिळवलेल्या प्रवीण ठिपसे याला बुद्धिबळातील सर्वोच्च असा 'ग्रँडमास्टर' किताब देण्याची घोषणा जागतिक बुद्धिबळ महासंघाने केली.
१९८५ : मूकबधिर जलतरणपटू तारानाथ शेणॉय याने तिसर्यांदा इंग्लिश खाडी पोहून पार करुन विक्रम केला.
२००१ : व्हेनिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मीरा नायर दिग्दर्शित 'मॉन्सून वेडींग' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा 'गोल्डन लायन' पुरस्कार मिळाला.
२००९ : ठीक ९ वाजुन ९ मिनिटे व ९ सेकंदांनी 'दुबई मेट्रो'चे उद्घाटन झाले.
२०१५ : एलिझाबेथ (दुसरी) युनायटेड किंग्डम वर सगळ्यात जास्त काळ राज्य करणारी राणी बनली.
२०१६ : उत्तर कोरियाने पाचवी अण्वस्त्र चाचणी पूर्ण केली आहे.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : लिओ टॉलस्टॉय रशियन लेखक (मृत्यू: २० नोव्हेंबर १९१०)
१८५० : भारतेंदू हरिश्चंद्र आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: ६ जानेवारी १८८५)
१८७४ : प्रसिद्ध भारतीय ओडिया भाषिक लेखक आणि भाषातज्ञ गोपालचंद्र प्रहराज यांचा जन्मदिन.
१८९० : कर्नल सँडर्स 'केंटुकी फ्राईड चिकन' चे संस्थापक (मृत्यू: १६ डिसेंबर १९८०)
१९०४ : भारतीय-पाकिस्तानी हॉकी खेळाडू फिनोझ खान यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल २००५)
१९०५ : भारतीय तत्त्वज्ञानी आणि कवी ब्रह्मारीश हुसैन शा यांचा जन्म. (मृत्यू: २४ सप्टेंबर १९८१)
१९०७ : साली राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसचं, सर्वोत्कृष्ट परराष्ट्रीय अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय चित्रपटसृष्टीतील एक प्रणेते निर्माता-दिग्दर्शक मेहबूब खान यांचा जन्मदिन.
१९०९ : लीला चिटणीस अभिनेत्री (मृत्यू: १४ जुलै २००३)
१९१० : नवलमल फिरोदिया गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती (मृत्यू: २६ मार्च १९९७)
१९३२ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक रचनाकार कांती कुमार जैन यांचा जन्मदिन.
१९४१ : अबीद अली अष्टपैलू क्रिकेटपटू
१९५० : श्रीधर फडके संगीतकार
१९६७ : साली सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता, निर्माता, मार्शल आर्टिस्ट अक्षय कुमार यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४३८ : एडवर्ड पोर्तुगालचा राजा (जन्म: ३१ आक्टोबर १३९१)
१९७६ : माओ त्से तुंग आधुनिक चीनचे शिल्पकार, मुत्सद्दी, मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते (जन्म: २६ डिसेंबर १८९३)
१९७८ : वॉर्नर ब्रदर्स चे सहस्थापक जॅक एल. वॉर्नर यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १८९२)
१९४७ : साली भारतातील सुविख्यात कलामर्मज्ञ तथा चिंतक आनंद कुमारस्वामी यांचे निधन.
१९४२ : स्वातंत्र्यसैनिक शिरीष कुमार यांचा गोळी लागून मृत्यू. (जन्म: २८ डिसेंबर १९२६)
१९६० : अली सिकंदर ऊर्फ 'जिगर मोरादाबादी' उर्दू कवी व शायर (जन्म: ६ एप्रिल १८९०)
१९९४ : सत्यभामाबाई पंढरपूरकर लावणीसम्राज्ञी (जन्म:)
१९९७ : आर. एस. भट 'युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया'चे पहिले अध्यक्ष (जन्म: )
१९९९ : पुरुषोत्तम दारव्हेकर नाटककार व लेखक (जन्म: १९२७)
२००१ : अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री अहमदशाह मसूद यांची हत्या (जन्म: २ सप्टेंबर १९५३)
२०१० : वसंत नीलकंठ गुप्ते समाजवादी कामगारनेते, लेखक व समाजवादाचे अभ्यासक (जन्म: ९ मे १९२८)
२०१२ : व्हर्गिस कुरियन भारतीय दुग्धोत्पादनातील 'धवल क्रांती'चे जनक, 'अमूल'चे संस्थापक, राष्ट्रीय दुग्धोद्योग विकास महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष, पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, रॅमन मॅगसेसे पारितोषिक विजेते (२६ नोव्हेंबर १९२१ कोहिकोड, केरळ)

# सरकारच्या मदतीच्या घोषणांची अतिवृष्टी तर शेतकऱ्यांच्या गळाला फास

## किसान सभेकडून विविध मागण्याबाबत बेमुदत धरणे आंदोलन

परळी । प्रतिनिधी

मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला असून लाखो एक्करावर उभे असलेले पीक पावसाच्या पाण्याने जमीनदोस्त झाले आहे.पावसाच्या अतिवृष्टीने बीड जिल्ह्यातील शेतकरी पुन्हा एकदा उध्वस्त झाला आहे.राज्याच्या कृषी मंत्र्याच्या मतदार संघातच सात दिवसात तीन शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले.संविधानिक पालकत्व असलेल्या राज्याच्या कृषी मंत्र्याच्या मतदार संघातच अशी लाजिरवाणी घटना समोर आल्याने राज्यकर्ते केवळ मदतीच्या घोषणांची तर विरोधकाकडून मागणीची अतिवृष्टी करत असून प्रत्यक्ष मदत अथवा केलेल्या घोषणांची अंमलबजावणी शून्य होत असल्याने पुन्हा एकवेळ शेतकरी आत्महत्या मालिका सुरू होते की काय? अशी भीती निर्माण झाली आहे. राज्यकर्त्यांनी तात्काळ



शेतकऱ्यांना मदत करावी यासह इतर मागण्या घेत सोमवार दि ९ पासून जिल्हाधिकारी कार्यालयावर बीड जिल्हा किसान सभेकडून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

आठवड्यामध्ये सलग दोन दिवस पावसाने जोरदार हजेरील लावली होती. यामुळे जिल्हयातील ६१ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झाली होती, अतिवृष्टीचा फटका शेतकऱ्यांना बसला असून जिल्ह्यातील ६५७ गावांमधील १ लाख ४४ हजार ५६४ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.मात्र संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पदरात अद्याप देखील कवडी देखील मिळाली नसल्याने शेतकरी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलून आपले जीवन संपवून घेत आहे. अतिवृष्टीमुळे शेतातील बाजरी, सोयाबीन, कापूस, उडीद, तुर, मुग आदींसह फळ आणि पालेभाज्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले आहे. या अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका बीड, माजलगाव, गेवराई, अंबाजोगाई आणि परळी तालुक्यांना बसला असून या तालुक्यातील १०० पेक्षा अधिक गावातील शेतातील पिकांचे नुकसान झाले आहे. कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ याला तोंड देत शेती करणारा जिल्ह्यातील शेतकरी यावर्षीच्या अतिवृष्टीने पूर्णपणे उध्वस्त झाला आहे.सततची नापिकी, कर्ज आणि सरकारची नाकर्ती भूमिका यामुळे शेतकरी आत्महत्या सारख्या घटना घडताना समोर येत असून राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री असलेल्या मंत्री महोदय यांच्याच मतदार संघात परळी, रवेली आणि कौडगाव साबळा येथील शेतकऱ्यांनी आत्महत्या केली.सरकारने बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी यासह विविध मागण्या संदर्भात किसान सभेकडून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती किसान सभेकडून कॉ. काशीराम सिरसाट,कॉ. गंगाधर पोटभरे, कॉ.भगवान बडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, कॉ. विष्णू देशमुख,कॉ. कृष्णा सोळके,कॉ. पाडूरंग राठोड कॉ. जगतीश फरताडे, कॉ. दादासाहेब सिरसाट, कॉ.एड. संजय चोले, कॉ.राजाभाऊ बादाडे, कॉ.रूस्तुम माने, कॉ.बळीराम देशमुख, कॉ.एड.अजय बुरांडे,डॉ. सावळाराम उबाळे आदींनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

> जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या यांच्याच मतदार संघात तीन शेतकऱ्यांनी मागील ७ दिवसात जीवन संपवून घेतले आहे या पार्श्वभूमीवर पिकविमा वितरण पारदर्शक करण्यासाठी सन २०२३ खरीप व रब्बी पिक विमा वितरणाच्या याद्या प्रकाशित कराव्यात.कापूस - सोयाबीन पिकांची ईपीक पाहणीची अट रद्द करून कुठल्याही अटी शर्ती शिवाय दोन्ही पिकांसाठी प्रत्येकी तीन-तीन हेक्टर मर्यादेपर्यंत मदत देण्यात यावी. अतिवृष्टीने नुकसान झालेल्या जिल्ह्यातील महसूल मंडळातील सर्व शेतकऱ्यांना च्या निकषासह व अतिवृष्टीची नोंद नसलेल्या महसूल मंडळातील शेतकऱ्यांना सततच्या पावसाचे अनुदान द्यावे.अतिवृष्टीने नुकसान झालेल्या विमाधारक शेतकऱ्यांना सॅम्पल सर्वे च्या आधारे तातडीने पिक विमा प्रावधानानुसार पीक विमा अदा करावा.शेतकऱ्यांचे संपूर्ण पीककर्ज सरसकट माफ करून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे.पीक कर्जापासून वंचित असणाऱ्या गरजू शेतकऱ्यांना तात्काळ पीक कर्जाची वाटप करावे यासह इतर मागण्या घेऊन किसान सभेकडून सोमवार दि ९ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.
>
> **कॉ. अजय बुरांडे**, जिल्हाध्यक्ष, बीड जिल्हा किसान सभा

# नूतन गणित, विज्ञान विषयांचे प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे आदेश निर्गमित

### पदोन्नती समितीचे अध्यक्ष प्रदीप काकडेंचा शिक्षकांनी सत्कार करून मानले आभार



धारूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेअंतर्गत उच्च प्राथमिक शाळांमध्ये रिक्त असलेल्या इयत्ता ६ ते ८ वीच्या गणित व विज्ञान विषयाचे प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे पदस्थापना आदेश गुरुवारी निर्गमित करण्यात आले आहेत. पदोन्नती समितीचे अध्यक्ष तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे यांचा सत्कार करून शिक्षकांनी आभार मानले आहेत.

बीड जिल्हा परिषदेने नुकतीच प्राथमिक पदवीधर शिक्षकांची दर्जावाढ प्रक्रिया राबवली होती. २ ऑगस्ट रोजी बी. एसी. पदवी पूर्ण असलेल्या पदवीधर शिक्षकांची कागदपत्र तपासण्याची प्रक्रिया शिक्षण विभागाकडून पूर्ण करण्यात आली होती. त्यानंतर काही दिवसांनी अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करून जिल्हा परिषद प्रशासनाने २० ऑगस्ट रोजी गणित, विज्ञान प्राथमिक पदवीधर शिक्षकांची समुपदेशन प्रक्रिया राबवल्या नंतरही पदस्थापना शिक्षकांना मिळाली नाही. वास्तविक समुपदेशन प्रक्रिया पार पाडल्यानंतर तत्काळ पदस्थापना आदेश पारीत व्हायला हवे होते. परंतु तसे न होता आदेश दोन ते तीन दिवसात मिळतील असे सांगण्यात आले होते. काही तांत्रिक कारणांमुळे आदेश देण्यास विलंब होत आहे वारंवार प्रशासनाकडून सांगण्यात येत नवीन पदस्थापना मिळालेल्या शिक्षकांनी अर्ज-विनंत्या केल्या, दररोज प्रशासनातील कर्मचारी अधिकारी यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रसिद्ध करुन आदेश पाहता लगेच विनंत्या करून पदस्थापना आदेश लवकरात लवकर निर्गमित करावेत यासाठी प्रयत्न केले. जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे हा प्रश्न काही शिक्षकांनी उपस्थित केल्यावर त्यांनी बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील, शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांना संबंधित प्रक्रियेतील त्रुटी दूर करून पदस्थापना आदेश तत्काळ निर्गमित करण्याच्या सूचना केल्या.

त्यानंतर जिल्हा परिषद प्रशासन तात्काळ कामाला लागले. पदोन्नती समितीचे अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे सामान्य प्रशासनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे यांची शिक्षकांनी भेट घेऊन सर्व तांत्रिक अडचणी लवकरात लवकर सोडवून गणित-विज्ञान प्राथमिक पदवीधर संवर्गाचे नवीन पदस्थापनेचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत, अशी मागणी केली. यानंतर प्रदीप काकडे यांनी या प्रकरणामध्ये लक्ष घालून संबंधित आदेश लवकरात लवकर कसे निर्गमीत होतील याची दक्षता घेत ५ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने यासंबंधीचे सर्व आदेश निर्गमित केले. बीड जिल्हा परिषद प्रशासनाने गणित, विज्ञान प्राथमिक पदवीधर दर्जावाढ प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे राबविल्याबद्दल पालकमंत्री धनंजय मुंडे, बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील, शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांच्यासह इतर सर्व अधिकारी-कर्मचारी यांचे आभार शिक्षकांनी मानले दरम्यान, प्रदीप काकडे यांचा सत्कार करून जिल्ह्यातील शिक्षकांनी आभार मानले.

# आष्टी, अंभोरा ठाण्यांतर्गत १४८ मंडळांना परवानगी

### आष्टी शहरातील तीन गणेश मंडळांना १०० वर्षांची परंपरा

आष्टी । प्रतिनिधी

शहरासह तालुक्यातील मुर्शदपूर, कड़ा, धानोरा, अंभोरा, धामणगाव, दौलावडगाव आदी गावांत 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया. म्हणत ढोल-ताशांच्या गजरात आणि गुलालाची उधळण करत गणरायाचे आगमन झाले. आपल्या लाडक्या बाप्पाला घरी आणण्यासाठी गणेशमूर्तीसोबतच पूजेसाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी बाजारात गर्दी झाली होती.

शहरातील मानाच्या गणपतींची रस्त्यावरून वाजतगाजत मिरवणूक काढून गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. अनेक गावांत सामूहिक पद्धतीने एकाच दिवशी एकाच वेळी, पारंपरिक पद्धतीने गणपतीचे आगमन झाले. आष्टी आणि अंभोरा पोलिस ठाण्यांतर्गत १४८ गणेश मंडळांना परवानगी देण्यात आली. आहे. आष्टी शहरातील मानाचे गणपती श्री दत्त गणेश मंडळ, युवक गणेश मंडळ, मित्रमंडळ गणेश मंडळ, पेठ गणेश मंडळ, जिवा महाले गणेश मंडळ,



कसबा गणेश मंडळ, हमाल पंचायत गणेश मंडळ, खासबाग गणेश मंडळ, मंडळांनी रीतसर परवानगी घ्यावी आष्टी पोलिस ठाण्यांतर्गत ९८ मंडळांनी तर अंभोरा पोलिस ठाण्यांतर्गत ५० मंडळांनी ऑनलाइन व ऑफलाइन अर्ज करून रीतसर परवानगी घेतली. उर्वरित मंडळांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यास त्यांनाही परवानगी देण्यात येईल. गणेश मंडळांनी एक ते दोन दिवसांत परवानगी घ्यावी, अन्यथा मंडळावर योग्य ती कारवाई केली जाईल, असा इशारा आष्टी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सोमनाथ जाधव व अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे यांनी दिला. आष्टी येथे शनिवारी मिरवणूक काढून श्रीगणेशाची स्थापना करण्यात आली. गणेशोत्सवातील पोलिस बंदोबस्त आष्टी पोलिस ठाण्याच्या गणेश मंडळाच्या बंदोबस्तासाठी १ पीआय, २ एपीआय, ३ पीएसआय, ४२ पोलिस अंमलदार, १ एसआरपी तुकडी, २५ होमगार्ड तर अंभोरा पोलिस ठाण्याच्या बंदोबस्तासाठी १ एपीआय, २६ पोलिस अंमलदार, १५ होमगार्ड यांचा बंदोवस्त तैनात करण्यात आला आहे. जय हनुमान तालीम गणेश मंडळ, चालक-मालक गणेश मंडळ, शिव शंभी गणेश मंडळ, बाबाजी प्रतिष्ठान गणेश मंडळ, लोकनेते गोपीनाथ मुंडे गणेश मंडळ, साम्राज्य प्रतिष्ठान गणेश मंडळ, सकल हिंदू समाज गणेश मंडळ, संघर्ष गणेश मंडळ, शिव छत्रपती गणेश मंडळ, बेलेश्वर गणेश मंडळ, जयहिंद गणेश मंडळ आदी गणेश मंडळांनी श्रींच्या मुर्तीची स्थापना केली. आष्टी शहरातील मानाचा समजला जाणारा येथे पेठेचा चा राजा या मंडळामध्ये दरवर्षी तरी गणेश मूर्ती मंडळाला भेट करतो याची अशी व्यख्यायिका आहे की नवसाला पावतो जो नवस बोलेल त्याची नवसपुरती झाल्या नंतर तो स्वतः गणेशची मुर्ती खरेदी करतो.

# चोपणवाडी येथील गणपतीची रमेश आडसकर यांच्या हस्ते आरती



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील चोपणवाडी येथे गणपतीची आरती मातलगांव मतदार संघाचे भाजपा नेते रमेशराव बाबुराव आडसकर यांच्या हस्ते उत्साही वातावरणात आरती संपन्न झाली.

गणेशोत्सवाच्या शुभ मुहूर्तावर दि ०८ सप्टेंबर रविवार रोजी गणपतीची आरती माजलगाव विधानसभेचे भाजपा नेते रमेशराव बाबुराव आडसकर यांच्या हस्ते आयोजित करण्यात आली होती.या आरतीस अनेक मान्यवर उपस्थित होते. एकोप्याची भावना आणि सामाजिक बंधनांच्या घट्ट विनण्यासाठी हा एक अविस्मरणीय क्षण ठरला.

यावेळी अर्जुन वनवे, रणजीत वनवे, सोमनाथ वनवे (फौजी), बाळासाहेब वनवे, विलास बडे (सरपंच),गोविंद बडे,सुशांत वनवे, सुधाकर वनवे, आशीष बडे,सुनील मुंडे,वामन वनवे, बंडू वनवे,सुरेश वनवे,राजेभाऊ देशमाने (पौंडी), राजेभाऊ वनवे, विठ्ठल गोरे तसेच भगवान कांदे (सरपंच संगम) यांची उपस्थिती होती.

# महादुर्ग किल्ल्यात बुरुज स्वछता अभियान

धारूर । प्रतिनिधी

येथील जय किसान गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत आज दि.०८ रोजी शहरातील ऐतिहासिक असलेल्या महादुर्ग किल्ल्यात स्वछता अभियान व बुरुज स्वछता अभियान राबविले यावेळी मंडळाचे सदस्य मोठ्या प्रमाणत उपस्थित होते.

गणेशोत्सव काळात गणेश मंडळे विविध सामाजिक उपक्रम घेऊन गणेशोत्सव साजरा करतात.असेच धारूर शहरातील जय किसान गणेश मंडळ सामाजिक लोकउपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करतात दहा दिवसांत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.ता.०८ रोजी मंडळाच्या वतीने येथील महादुर्ग किल्ल्याची स्वछता व बुरुज स्वछता अभियान राबविण्यात आहे. बुरुजावर चढलेले मोठे मोठे झाडे यावेळी तोडण्यात आले तसेच या तोडलेल्या झाडांच्या खोडावर एसिड टाकले जेणे करून पुन्हा ते झाड उगवले नाही पाहिजे व बुरुज अबाधित राहिला पाहिजे.झाड बुरुजावर झाड तोडणाऱ्या सदस्याला आत्याधुनिक बेल्ट,हेल्मेट,सिडी इत्यादींचा वापर केला तसेच सायंकाळी मंडळाच्या वतीने शहरात घरोघरी जाऊन फळ झाडांचे वाटप केले यावेळी





प्रामुख्यानेजांब, आंबा, जांभळ, आवळा चे झाडे होते. असे अनोखी उपक्रम राबवत असल्याने मंडळाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# नागरी सुविधा मिळेनात नागरिकांमध्ये संताप

### मुख्यधिकारी याचां मनमानी कारभार : नगरपरीषद व्यवस्थापनाचे तिन तेरा







धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरातील नागरिकांना चांगल्या दरज्याच्या नागरी सुविधा देण्यात अपयशी ठरलेलं मुख्याधिकारी शहरातील विविध समस्यांवर उपाय योजना करायच्या सोडून झोपेचे सोंग घेत आहेत का असा प्रश्न शहरातील नागरिकांना पडला आहे.शहरातील खराब रस्ते, अस्च्छता पाण्याचा प्रश्न,पथदिवे इत्यादीमुलभूत सुविधा ही मिळणे मुश्कील मुख्याधीकारी होलसेल कारभारी झाल्याने सर्व व्यवस्थाचे तिन तेरा वाजले असुन कागदोपत्री व फोटो चा दिखावा कार्यक्रम सुरू आहे वरीष्ठ या कडे लक्ष देणार का असा प्रश्न केला जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न झाल्यामुळे धारूर नगर परिषदेमध्ये लोकप्रतिनिधी निवडून गेलेले नाहीत नगरपरिषदेचा सर्व कारभार मुख्याधिकारी व प्रशासक यांच्या मार्फत सुरू आहे धारूर नगरपरिषदेचा अधिकारी व प्रशासक पदाचा कारभार महेश गायकवाड यांच्याकडे आहे त्यामुळे एक अधिकार शाही वाढली आहे शहरातील विविध समस्यांकडे मुख्याधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे सणसदिच्या काळात शहरातील अनेक विभागात घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

तसेच रस्त्यांवर मोठा खड्ड्यांमध्ये पाणी जमा होऊन रस्ते जलयुक्त झाले आहेत त्यामुळे बाजारपेठे त खरेदीसाठी येणाऱ्या महिला नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे पावसामुळे तुंबलेल्या गटारा मधील घाण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर जमा होते त्यामुळे रोगराई पसरण्याचाही धोका निर्माण झाला आहे याकडे मुख्याधिकाऱ्यांनी गंभीर्याने लक्ष देऊन शहरातील नागरिकांना चांगल्या दर्जाच्या नागरिक सुविधा द्याव्यात अशी मागणी शहरातील नागरिकांच्या वतीने केली जात आहे.

शहरातील अनेक भागातील गटारातील घाण रस्त्यांवर रोगराई पसरण्याचा धोका .सणासुदीच्या काळात शहरातील अनेक पथदिवे बंद. मुख्य बाजारपेठेसह अनेक रस्ते चिखलात व दलदलीत, नागरिक त्रस्थ. शहरात स्वच्छतेचा आभाव दुर्गंधीयुक्त रस्ते. खड्डे आणि चिखलातून गणरायाच्या आगमनाची मिरवणूक गणेश भक्तांमध्ये नाराजी.

पाणीपुरवठा ही सुरळीत होत नाही सार्वजनिक स्वच्छता ग्रहाकडे दुर्लक्ष इत्यादी प्रश्नांची उत्तरे मुख्याधिकारी देणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# ऑल इंडिया पँथर सेनेच्या संपर्क कार्यालयाचे उदघाटन

### उपस्थित राहण्याचे सोनवणे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचे योद्धा मनोज दादा जरांगे पाटील व राष्ट्रीय अध्यक्ष दीपक भाई केदार ऍड अविनाश जी गंडले यांच्या हस्ते ऑल इंडिया पँथर सेनेच्या बीड जिल्हा संपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोमवार दिनांक ०९/०९/२०२४ ठिक २ वाजता शिवराज पान सेंटर समोर बडगे बापू बिल्डिंगच्या खाली जगताप कॉम्प्लेक्स येथे संपन्न होणार आहे.

ऑल इंडिया पँथर सेनेच्या माध्यमातून दलित शोषित पीडित आदिवासी मुस्लिम बहुजन वर्गाच्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी देशात अस्तित्वात असलेल्या मनुवादी व्यवस्थेविरोधात संविधान वाचवण्याचा लढा तीव्र करण्यासाठी जनसामान्यांच्या मूलभूत प्रश्नासाठी आंदोलनात्मक पवित्र घेऊन जनसामान्यांचे जन आंदोलन उभा करण्यासाठी दलित अत्याचार ही राष्ट्रीय आपत्ती



सारखी परिस्थिती असून दलित अत्याचार विरोधात आवाज उठवण्याचे काम या संघटनेच्या माध्यमातून होत आहे. जातीयता ही कोरोनापेक्षा भयानक व्हायरस आहे हा व्हायरस नष्ट करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. तरी बीड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज, फुले,शाहू, आंबेडकर, अणाभाऊ साठे, टिपू सुलतान यांच्या विचारावर चालणाऱ्या सर्व कार्यकर्ते पदाधिकारी समाज बांधव यांनी उपस्थित राहावे. असे आव्हान ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी केले आहे.

# अकरा वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या त्या नराधमाला फाशीची शिक्षा द्या

## मनसेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

पेठ बीड भागातील आरेफ आली नगर,मोहम्मद कॉलोनीतील एका मक्तब मध्ये अरबी शिक्षण देणाऱ्या धर्मगुरू कडून ११ वर्षीय अल्पवयी मुलीवर लैंगिक अत्याचार करण्याचे प्रकार ५ सप्टेंबर रोजी उशिरा रात्री समोर आले.याप्रकरणी नराधमाला फाशीचे शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाधिकारी कार्यालय समोर आंदोलन करण्यात आले.

बीड जिल्ह्यासह राज्यभरात महिला सुरक्षितेचा विषय गंभीर होत चालला असून मागील काही महिन्यापासून महिला अत्याचाराच्या घटना समोर येत आहे.काल परवा पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आरेफ आली नगर,मोहम्मद कॉलोनीतील एका मक्तब मध्ये अरबी शिक्षण देणाऱ्या




धर्मगुरू कडून ११ वर्षीय अल्पवयी मुलीवर लैंगिक अत्याचार करण्याची घटना समोर आली. याप्रकरणी ५ सप्टेंबर रोजी उशिरा रात्री गुन्हा दाखल झाला असून आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शनिवारी सकाळी ११:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी मनसेचे सुमत धस (जिल्हा अध्यक्ष),श्रीराम बादाडे (जिल्हा अध्यक्ष),राजेंद्र मोटे (जिल्हा अध्यक्ष),वर्षा ताई जगदाळे (महिला राज्य उपाध्यक्षा),सोमेश कदम (जिल्हा सचिव),ऋषीकेश गिराम (विद्यार्थी सेना जिल्हा अध्यक्ष),अशोक सुरवसे (शेतकरी सेना जिल्हा अध्यक्ष),सदाशिव बिडवे (उपजिल्हा अध्यक्ष),करण लोंढे (शहर अध्यक्ष),आदर्श तरकसे (शहर उपाध्यक्ष),पठाण अमर जान (शहर संघटक),प्रतिक लोळगे,मुस्तफा पठाण सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे झाडांनाच देव मानणाऱ्या इन्फंट्री इंडियाच्या बारगजे यांनी झाडालाच श्री गणेशाचा आकार देऊन सुंदर मूर्ती झाडाच्या खोडावर तयार केली आणि दररोज दोन वेळा या गणेशाची आरती होते आराधना होते झाडांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा हा संदेश यातून दिला जातो






बीडः इन्फंट इंडिया या संस्थेतील मुलांसाठी भगवान बाबा प्रतिष्ठानच्या वतीने पुस्तके रॅक व इतर शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. रविवारी प्रतिष्ठानचे सचिव रमाकांत धस यांच्यासह संजय मिसाळ पत्रकार विशाल साळुंके, इन्फंट इंडियाचे दत्ताभाऊ बारगजे ,त्यांचे सर्व सहकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# सोयाबीन व कापूस हमीभावाने खरेदी करा - संभाजी ब्रिगेडची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सोयाबीन व कापूस हमीभावाने खरेदी करा अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपजिल्हाधिकारी आणि कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

याबाबत संभाजी ब्रिगेडचे जिल्हा सचिव नारायणराव मुळे, जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर मिसाळ, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष सिद्राम यादव, मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के, संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ.अश्विनीताई



यादव लोमटे, अंबाजोगाई तालुकाध्यक्षा सुनंदाताई लोखंडे, बी.व्ही.शिंदे आदींसह इतरांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई यांना बुधवार, दिनांक ४ सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात नमूद

### उपजिल्हाधिकारी, कृषि उत्पन्न बाजार समितीला निवेदन

केले आहे की, केंद्र शासनाने सन २०२४ - २०२५ या वर्षासाठी सोयाबीन पिकाला ४८९२/- रूपये व कापूस या पिकाला मध्यम स्टेफल ७१२१/- रूपये व कापूस पिकाला लांब स्टेफल ७५२१/- रूपये हमीभाव दिला आहे. म्हणून आपण ही सोयाबीन व कापूस हमीभावाने खरेदी करावे. कारण की, जे व्यापारी सोयाबीन व कापूस हमीभावापेक्षा कमी भावाने खरेदी करीत आहेत. त्यांचे परवाने रद्द करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. आपण हमी भावापेक्षा कमी भावाने खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर जर गुन्हे नाही दाखल केले. तर संभाजी ब्रिगेड (ता.अंबाजोगाई जि.बीड) यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. याची कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी नोंद घ्यावी. सर्व परवानाधारक आडते व व्यापाऱ्यांना हमीभावाचे परिपत्रक काढून कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई यांनी कळवावे. सर्व पिकांच्या ◀◀ पान ३ वर

# अल्पसंख्याक समाजातील उम्मे हनी शेख यांचे काम प्रेरणादायी- सौ. जयश्री विधाते



**बीड । प्रतिनिधी**

शहरात थोड्याच दिवसात नावारूपाला आलेली कॉसमिक ॲबकस या संस्थेने शेकडो विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तर हाजारो विद्यार्थ्यांना ऑनलाईन ॲबकसचे प्रशिक्षण दिले असुन बीड शहरच नव्हे तर बीड जिल्ह्यातील आणि पुणे मुंबई सारख्या मेट्रो सिटी तील अनेक विद्यार्थी घडविण्याचे काम केले आहे , अल्पसंख्याक समाजातील सर्वसाधारण परिवारातील एक मुलगी ज्या वयात शिक्षण घ्यायचे त्या वयात शिक्षणाबरोबरच अनेक विद्यार्थ्यांना ॲबकसचे धडे देण्याचे जे काम करते ते फक्त अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठीच नव्हे तर सबंध महीला व मुलींसाठी प्रेरणादायी आहे असे गौरवोद्गार कॉस्मीक ॲबकस च्या बक्षीस आणि प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमच्या मुख्य अतिथी बीड नगरपरिषदेच्या माजी सभापती तथा नगरसेविका सौ. जयश्री विलास विधाते यांनी काढले.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे युवानेते प्रा. अमर शेख तर प्रमुख अतिथी म्हणून सौ. जयश्री ◀◀ पान ३ वर



## वांगी येथे घरोघरी मातीचे गणपती चे पुजन

दिंद्रुड :- माजलगाव तालुक्यातील वांगी बु. येथे अजूनही पारंपरिक पद्धतीने बनवलेल्या मातीचे गणपतीचे पूजन घरोघरी केले जाते. दहा दिवस गणपती बाप्पांचा उत्सव साजरा करून याच पार्थिव गणपतीचे विसर्जन केले जाते. यामुळे प्रदूषणही होत नाही, पर्यावरण प्रदूषित होणार नाही याची काळजी गावकरी करत आहेत, यामुळे नदी, तलावात होणारे प्रदूषण नियंत्रनात राहते. अशोक जाधव वांगी यांनी सांगितले की प्रत्येकाणे आपल्या घरी मातीचे गणपती तयार करून त्यांचे पुजन करून नंतर ते पाण्यात विसर्जन केल्यास प्रदूषण होणार नाही.

# विद्यार्थी अन् युवकांसाठी सम्यक संवाद मेळाव्याचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा विभागातील बीड जिल्हा सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने बीड जिल्हास्तरीय सम्यक संवाद मेळाव्याचे आयोजन शिक्षणाचे माहेरघर अंबाजोगाई येथे सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने करण्यात आले आहे.प्रा.अंजलीताई आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रदेश उपाध्यक्ष ॲड.सर्वजीत बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.०९ सप्टेंबर सोमवार रोजी हा मेळावा होणार आहे या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे लिंबराज गायकवाड यांनी केले आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संशोधक, पीएचडी धारकांचा प्रश्न, थेट परिपत्रक जाचक नियम व अटी व रद्द प्रश्न, शिष्यवृत्ती जाचक नियम व अटी, मुलांचे, मुलींचे वस्तीगृह प्रश्न, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्यामुळे शैक्षणिक क्षेत्रातील अडचणींचा प्रश्न अशा शैक्षणिक क्षेत्रातील अनेक प्रश्नावर या सम्यक संवाद मेळाव्यामध्ये चर्चा होणार असून मार्ग निघणार आहे.

तरी सदरचा मेळावा हा अंबाजोगाई येथील हॉटेल ईट ॲण्ड स्टे येथे आज दुपारी १२ वाजण्यापासून सुरु होत असून या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन लिंबराज गायकवाड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गोविंद इतापे यांच्यासह शेकडो युवकांचा मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील शेळके गल्ली परिसरातील युवा कार्यकर्ते गोविंद इतापे यांच्यासह मित्रमंडळाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश केला. माजलगाव येथील मोहनराव जगताप यांच्या संपर्क कार्यालयात प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला यावेळी गोविंद ईतापे यांच्या मित्र मंडळाच्या सर्व युवकांनी मोहनराव जगताप यांच्या पाठीमागे संपूर्ण ताकद उभा करण्यासाठी हा



प्रवेश करत असल्याचे सांगितले.

यावेळी मोहनराव जगताप त्यांनी सर्व युवकांसाठी आपले दार चोवीस तास उघडे असल्याचे सांगून युवकांच्या अडी अडचणी ते प्राधान्याने सोडवतील असे सांगितले. तसेच मोहनराव जगताप यांनी या युवकांच्या प्रवेशामुळे माझी ताकद वाढली असल्याचे सांगून गोविंद इतापे यांच्यासह सर्व युवकांचा यथोचित सन्मान केला. यावेळी गोविंद इतापे यांच्यासह पांडुरंग इतापे,अंगद रोमन, श्रीराम शेळके, गणेश शेळके, सुनील नावडकर, अनिल साळवे, बाळू साळवे, अशोक इतापे, नितीन शेळके, पांडुरंग गडदे, मोहसीन मोबीन, शेख हबीब, लक्ष्मीकांत साळवे, आकाश इतापे, सचिन धपाटे, रवी धपाटे, संभाजी मुंडे, सतीश रोमन, वशिष्ठ रोमन,मच्छिंद्र इतापे, विठ्ठलराव कोंबडे, अरुण गोमचाळे, भिकू पौळ, राम बावणे, ◀◀ पान ३ वर

# गणपती बप्पा मोरयाच्या जय घोषाने अंबानगरी दुमदुमली; जल्लोषात स्वागत



अंबाजोगाई (प्रतिनिधी)- समाजाचे ऐक्य जोपासणार्या गणरायाचे शनिवार,दि.०७ सप्टेंबर २०२४ रोजी मोठ्या थाटामाटात व डॉलबीच्या तालावर आगमन झाले. विशेष म्हणजे शनिवार ही वरूणराजाने आपली हजेरी लावली. त्यामुळे गणेशोत्सवाचा आनंदद्विगुणित झाला.

समाजाचे ऐक्य जोपासणारा गणेशोत्सव शनिवार पासुन प्रारंभ झाला असून १० दिवसांच्या या उत्सवाची सांगता १७ सप्टेंबर रोजी होईल. दरम्यान समाज प्रबोधन हा हेतु ठेवून हा उत्सव साजरा केला जातो. विविध सांस्कृतिक धार्मिक व अन्य विविध उपक्रम या निमित्त साजरे केले जातात. व्याख्यानमाला, विविध खेळांच्या स्पर्धा व अन्य स्पर्धा यांचा ही यात समावेश असतो. अंबाजोगाई शहराला सांस्कृतिक, ऐतिहासिक, शैक्षणिक, साहित्यीक असे महत्व आहे. पुर्वी गणेशोत्सवाच्या काळात मेळे साजरे केले जात होते. आता त्याचे रूपांतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी दाखवले जाते. मेळे हे अंबाजोगाईच्या सांस्कृतिक क्षेत्राचे

वैशिष्ट्ये मानले जात होते. या मेळ्यातून अंबाजोगाईने अनेक मान्यवर कलावंत घडविले. व्याख्यानमाला त्याच बरोबर विविध स्पर्धा या निमित्ताने अंबाजोगाईकरांना पहाण्याचा व त्यात सहभागी होण्याचा आनंद घेता येणार आहे.

अंबाजोगाई ◀◀ पान ३ वर

# जी माणसे माणसासोबत उचित व्यवहार करतात तेच खरे सुखी असतात –भिक्खू धम्मशील थेरो

**माजलगाव । प्रतिनिधी**

माणसाचे माणसा सोबत असलेले माणुसकीचे नाते हाच बुद्ध धम्माचा केंद्रबिंदू आहे, म्हणून माणूस असाल तर माणसा सारखे वागले पाहिजे.जी माणसे माणसा सोबत उचित व्यवहार करतात तीच माणसे खरी सुखी असतात.समस्त मानव जातीला मनुष्यत्व प्राप्ती साठी बुद्ध धम्मा शिवाय पर्याय नाही.असे प्रतिपादन आपल्या साप्ताहिक प्रवचनात पूज्य भिक्खू धम्मशील थेरो यांनी केले.

सदधम्म सेवा संघाच्या वतीने श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी वसाहत येथे साप्ताहिक धम्मदेसनेच्या प्रवचन मालिकेत दि.८ सप्टेंबर २०२४ रोजी पू. भिक्खू धम्मशील थेरो आपल्या मानवी जीवनात बुद्ध धम्माचे



महत्त्व या विषयावरील प्रवचन मालिकेत पहिले पुष्प गुंफताना बोलत होते. पुढे बोलताना भिक्खू म्हणाले की, बुद्धाचा धम्म हा बहुआयामी असून माणसाचे मंगल होण्यासाठी सर्वांगीण मार्ग सांगतो. मानवी जीवनाचा उत्कर्ष बुद्ध धम्मातच असल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २१ वर्षाच्या काळात विविध धर्माच्या अभ्यासानंतर बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला.

धम्म मनोरंजनाचा नाही तर, धम्मात नीतीमतेला स्थान आहे. धम्म म्हणजे नीती आणि नीती म्हणजे धम्म आहे.

इथे मनाला विचारांचा आहार दिला जातो. आपले वर्तन सुधारायचे असेल तर केवळ मनोरंजन करून जमणार नाही. खरा धम्मरस समजून घ्यावा लागेल.

अर्थात धम्माचा उद्देश समजून घ्यावे लागेल. यापैकी पहिला उद्देश माणसाने मनुष्यत्व प्राप्ती करून घेणे आहे. ◀◀ पान ३ वर

# मराठवाडा साहित्य परिषद कार्यकारी मंडळ निवडणूक कार्यक्रम जाहीर

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

मराठवाडा साहित्य परिषद कार्यकारी मंडळाचा निवडणूक २०२४ कार्यक्रम नुकताच जाहीर झाला असून मंडळाच्या निवडणूकीसाठी मतदारांची प्राथमिक यादी २१ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध झाली होती. त्यावरील आक्षेप वा दुरूस्तीसाठीची मुदत संपल्याने दि.६ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता ती प्रकाशित करण्यात आली आहे.

मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद

या निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्रे भरण्याची मुदत दि.१४ सप्टेंबर २०२४ ते २० सप्टेंबर २०२४ अशी असून दि.२१ सप्टेंबर रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होऊन वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २३ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२४ अशी आहे. उमेदवारांची अंतिम यादी दि.२५/०९/२०२४ ला प्रसिद्ध होईल. तद्नंतर दि.१०/१०/२४ ते दि.८/११/२४ या कालावधीमध्ये निर्वाचन अधिकाऱ्यांनी मतदारांना मतपत्रिका पाठवणे आणि मतदारांनी त्या मतपत्रिका निर्वाचन अधिकाऱ्यांकडे परत पाठवणे असा कार्यक्रम आहे. दि.९/११/२४ रोजी सकाळी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आळंदी मध्ये शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

**आळंदी । प्रतिनिधी**

आळंदी येथे शिवसेना(शिंदेगट) आळंदी शहर प्रमुख राहुल चव्हाण यांचे आळंदी शहर शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाचे( जनसंपर्क कार्यालय) उदघाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.




यावेळी दादासाहेब भुसे सार्वजनिक बांधकाम मंत्री, खासदार श्रीरंग आप्पा बारणे, इरफान भाई सय्यद शिवसेना उपनेते, भगवान पोखरकर शिवसेना पुणे जिल्हा प्रमुख, शिवाजीराव आढळराव पाटील माजी खासदार, नितीन गोरे सदस्य महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ, अक्षय जाधव शिवसेना पुणे जिल्हा संघटक , निलेश पवार शिवसेना पुणे जिल्हा संघटक, प्रकाश वाडेकर मा. शिवसेना तालुका प्रमुख, अक्षय महाराज भोसले, निलेश आढळराव, सचिन गिलबिले, दिनेश घुले, ड. सचिन काळे, हनुमंत चव्हाण, योगेश तळेकर, सचिन तळेकर, राहुल थोरवे, योगेश पगडे, शिवाजी पगडे, बाबा पाटोळे,ह भ प विलास तात्या बालवडकर, ह भ प मोहन महाराज शिंदे, ज्ञानेश्वर गारकर, विनायक महामुनी, नितीन ननवरे , राजेंद्र जाधव,सचिन शिंदे, किशोर देशपांडे, निवृत्ती मुरकुटे,ज्ञानेश्वर घुंडरे, शशिकांत बाबर,ह भ प माऊली महाराज पडघन, रोहिदास कदम, ह भ प श्री संदीप नगरे, ह भ प ताई माऊली महाराज, संगीता चव्हाण, सोनाली शिंदे, अश्विनी ननवरे, सायरा शेख,संगिता दाभाडे,,सरस्वती खोडसे,शारदा घनघाव,महेक शेख,बबिता शिंदेभाग्यश्री गावडे,श्रीदेवी बिराजदार, पुजा घनघाव, मिनाक्षी वाडेकर, अनूराधा जाधव व श्रीराम कृष्ण वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी उपस्थित होते.

# दोन्ही टायर फुटल्याने खासगी बस ३० फूट खाली जाऊन आदळली, इंदापूरजवळ , १० ते ११ प्रवासी जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे –सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर इंदापूर शहरापासून दोन ते अडीच किलोमीटर अंतरावर खासगी प्रवाशी बसला अपघात झाला. पुण्याच्या दिशेने ही बस निघाली होती आणि इंदापूर बाह्यवळणापासून पुढे दोन ते अडीच किलोमीटर अंतरावरती आल्यानंतर या बसचे दोन्ही टायर फुटल्याने अपघात झाला आहे.

टायर फुटल्याने लोखंड वाहतूक करणाऱ्या एका ट्रकला या बसने धडक दिली. ही बस पुणे सोलापूर महामार्ग ओलांडून जवळपास २५ ते ३० फूट खाली जाऊन आदळलीय. या बसमध्ये नेमकी किती प्रवासी होते याची माहिती अद्याप मिळाली नाही. मात्र या बसमधील १० ते ११ प्रवासी जखमी झाले असून या जखमींना इंदापूर पोलिसांनी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच इंदापूर पोलीस आणि एनएचएआय चे पथक या ठिकाणी दाखल झाले आहे. खासगी बस सोलापूर जिल्ह्यातील सांगोलामधून पुण्याच्या दिशेने



निघाली होती. सुदैवानं या दुर्घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी मात्र बसचा आणि या खाजगी मालवाहतूक करणाऱ्या ट्रकचे मोठे नुकसान झालय. तर १० ते ११ प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. इंदापूर पोलीस महामार्गावर अपघात ग्रस्त असणारा ट्रक बाजूला घेण्याचे काम करत असून पोलिसांनी वाहतूक देखील सुरळीत केली आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये जिम्नॅस्टिक खेळातील प्रथम आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक म्हणून हर्षद कुलकर्णी यांची नवी ओळख

पिंपरी । प्रतिनिधी

काऊलून, हाँगकाँग येथे दिनांक १० ते १४ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक संघटनेतर्फे आशियाई जिम्नॅस्टिक युनियन व हाँगकाँग जिम्नॅस्टिक संघटनेच्या संयुक्त विद्यमाने एरोबिक जिम्नॅस्टिक या क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षक प्रशिक्षण वर्ग लेव्हल १ संपन्न झाला. या वर्गाला भारतातून महाराष्ट्राचे हर्षद कुलकर्णी व गुजरातचे सागर बिडीवाला यांनी निवड झाली होती. ८ देशांमधून २१ प्रशिक्षकांनी या वर्गात सहभाग नोंदवला होता. बल्गेरियाच्या कोच देसी व पोर्तुगालच्या कोच ऐना यांनी




या वर्गास मार्गदर्शन केले.

हर्षद कुलकर्णी हे रहायला चिंचवडमध्ये असून गेली १८ वर्षे एरोबिक जिम्नॅस्टिक या क्रीडा प्रकारात कार्यरत आहेत. आजवर त्यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवडमधील सर्वाधिक राज्य व राष्ट्रीय पदक विजेते खेळाडू हेवन जिम्नॅस्टिक अकादमीच्या माध्यमातून घडवण्याचा मान आहे. तसेच लेव्हल १ च्या प्रशिक्षण वर्गात निवड झालेले पिंपरी चिंचवडमधील पहिले प्रशिक्षक आहेत. सदर परीक्षेत प्रथम दर्जाने ते उत्तीर्ण झाले आहेत.यानिमित्ताने त्यांनी राष्ट्रीय जिम्नॅस्टिक संघटना, राज्य संघटना व पिंपरी चिंचवड जिम्नॅस्टिक संघटनेचे आभार मानले. माझ्या सर्व खेळाडू, पालक व सहकारी प्रशिक्षकांमुळे हे शक्य झाले, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातून जिम्नॅस्टिक संघटना सचिव मकरंद जोशी, उपाध्यक्ष आदित्य जोशी, भारतातून युमनाम रंजन, सुरेंद्रपाल सिंग, सुनील छत्री, कौशिक बिडीवाला, संजोग ढोले, पिंपरी चिंचवडमधून संघटना अध्यक्ष संजय मंगोडेकर, संजय शेलार, दिपक सुनारिया, मनोज काळे यांनी हर्षद यांचे कौतुक केले.

# गणेशोत्सवात या २७ ठिकाणी करण्यात आली आहे वाहने लावण्याची व्यवस्था...

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवात मध्यभागात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी २७ ठिकाणी वाहने लावण्याची व्यवस्था वाहतूक पोलिसांकडून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शहराच्या मध्यभागात मानाच्या गणपतींचे दर्शन, तसेच देखावे पाहण्यासाठी पुणे शहर, तसेच जिल्ह्यातून भाविकांची गर्दी होते. उत्सवाच्या काळात परगावाहून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. भाविकांना मोटारी, तसेच दुचाकी लावण्यासाठी २७ ठिकाणी पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली.विसर्जन मिरवणुकीची सांगता होईपर्यंत भाविकांसाठी पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली.

न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग (दुचाकी), शिवाजी आखाडा, मंगळवार पेठ, (दुचाकी ,चारचाकी), एच. व्ही. देसाई महाविद्यालय, (पोलीस पार्किंग), हमालवाडा, नारायण पेठ, (दुचाकी, चारचाकी), गोगटे प्रशाला,



नारायण पेठ, (दुचाकी), एसएसपीएमएस, शिवाजीनगर, (दुचाकी, चारचाकी), स. प. महाविद्यालय, (दुचाकी, चारचाकी), पीएमपीएल मैदान, पूरम चौक, सारसबाग, (चारचाकी), पेशवे पार्क, सारसबाग, (दुचाकी), हरजीवन हॉस्पिटल, सारसबाग, (दुचाकी), पाटील प्लाझा, मित्रमंडळ चौक, (दुचाकी), पर्वती ते दांडेकर पूल, (दुचाकी), दांडेकर पूल ते गणेश मळा, (दुचाकी), गणेश मळा ते राजाराम पूल, (दुचाकी), नीलायम चित्रपटगृह, (दुचाकी, चारचाकी), विमलाबाई गरवारे प्रशाला, डेक्कन जिमखाना, (दुचाकी), आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रस्ता, (दुचाकी, चारचाकी), संजीवन रुग्णालय मैदान, कर्वे रस्ता, (दुचाकी, चारचाकी) आपटे प्रशाला, (दुचाकी), फर्ग्युसन महाविद्यालय, (दुचाकी, चारचाकी), जैन हॉस्टेल, बीएमसीसी रस्ता, (दुचाकी, चारचाकी), मराठवाडा महाविद्यालय, (दुचाकी), पेशवे पथ, (दुचाकी), रानडे पथ, (दुचाकी, चारचाकी), काँग्रेस भवन रस्ता, शिवाजीनगर, (दुचाकी), न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता, (दुचाकी, चारचाकी), नदीपात्र, भिडे पूल ते गाडगीळ पूल (दुचाकी, चारचाकी)

# अंगावर चिखल उडाल्याने एकावर खुनी हल्ला

पिंपरी । प्रतिनिधी

अंगावर चिखल उडल्याच्या कारणावरून दोघांनी मिळून एका वाहन चालकाला कोयता व लोखंडी रॉडने मारून जखमी केले. ही घटना शुक्रवारी (दि. ६) रात्री साडे अकरा वाजताच्या सुमारास शिवराज नगर, रहाटणी येथे घडली.




विशाल नथू गायकवाड (वय ३०, रा. रहटणी) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. त्यांनी या प्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार किशोर पांचाळ (वय २०), करण उर्फ मुन्ना गजानन चोपवाड (वय २४, दोघे रा. रहाटणी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गायकवाड हे त्यांच्या दुकानासमोर टेम्पो पार्क करून टेम्पोतून उतरून त्यांच्या मित्रांशी बोलत असताना आरोपी तिथे आले. त्यांनी 'आमच्या अंगावर चिखल का उडवला' असे विचारून गायकवाड यांचे काहीही न ऐकता 'तुला लय माज आला आहे का. तुला आज संपवूनच टाकतो' असे म्हणत कोयत्याने वार केले. तसेच लोखंडी रॉडने मारहाण केली. यामध्ये फिर्यादी गायकवाड हे जखमी झाले. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

# पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड, रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघ उपांत्यपूर्व फेरीत

**पुणे । प्रतिनिधी**

गतविजेता पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड (पीएसपीबी) संघ हॉकी महाराष्ट्र आयोजित (झींपश )आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने सुरू असलेल्या चौथ्या हॉकी इंडिया वरिष्ठ पुरुष आंतर-विभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरणारा पहिला संघ ठरला. उपविजेता रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघानेही (आरएसपीबी) अंतिम ८ संघांतील स्थान निश्चित केले.

मेजर ध्यानचंद स्टेडियम, नेहरूनगर-पिंपरी येथील स्पर्धेत रविवार पहिल्या सामन्यात पीएसपीबीने सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसवर (सीबीडीटी) ५-




४ असा विजय मिळवला. त्यांचा हा सलग तिसरा विजय आहे. सर्वाधिक ९ गुणांसह त्यांनी अ गटामध्ये अव्वल स्थान कायम राखले.

युसूफ अफानने (२रा – पीसी) पीएसपीबीचे खाते उघडले. त्यानंतर रोझन मिन्झच्या (९वा, ४१वा) दोन गोलनी त्यात भर घातली. सुमित कुमार (३८ वे) आणि दीपसन टिर्कीने (५९ वे – पीसी) प्रत्येकी एक गोल करताना गोलसंख्या पाचवर नेली. सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेससाठी विकास चौधरी (५४वे; ६०वे – पीसी) आणि प्रणम गौडा (२९ वे – पीसी) तसेच मरीश्वरन शक्तीवेलने (५० वे) गोल केले.

ब गटामध्ये, रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्डाने (आरएसपीबी) स्टील प्लांट स्पोर्ट्स बोर्डावर मात करताना तिसरा विजय मिळवला. आरएसपीबीकडून परदीप सिंग (३३वा, ४७वा) आणि (गुरसाहिबजीत सिंगने (२३वा) गोल केले. या विजयासह आरएसपीबीने ३ सामन्यांतून त्यांची गुणसंख्या ९ वर नेली.

अन्य सामन्यांमध्ये, अ गटामध्ये इंडो तिबेटियन बॉर्डर पोलीस (आयटीपीबी) सेंट्रल हॉकी संघाने सेंट्रल सेक्रेटरिएटविरुद्ध ३-३ अशी बरोबरी साधली. तरनजोत सिंग (१६वे – पीसी), विजय कुमार गोंड (१८वे – पीसी), अनिलने (५७वे – पीसी) आयटीपीबीसाठी गोल केले. केंद्रीय सचिवालयाकडून कवलजीत सिंग (३९ वे) आणि एम. हसन बाशाने (५२वे, ५३वे) गोल करताना बरोबरी साधली.बरोबरीसह आयटीपीबीने (२ सामने, १बरोबरी) गुणांचे खाते उघडले. केंद्रीय सचिवालय संघाचे ४ गुण (३ सामने) झाले. अ गटात ते दुसऱ्या स्थानी आहेत.

# एवढी कामं करुन बारामतीकर वेगळा निर्णय घेतात तर बारामतीकरांना मी सोडून आमदार मिळावा –अजित पवार

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीत एका मेळाव्याला संबोधित केलं. या मेळाव्यात अजित पवार यांनी लोकसभेला झालेल्या पराभवावर भाष्य केलं. विकासकामं करुन देखील जर बारामतीकर वेगळा निर्णय घेणार असतील तर बारामतीला देखील वेगळा आमदार मिळाला पाहिजे, असं अजित पवार म्हणाले. त्यानंतर माझ्या आमदारकीच्या कार्यकाळाची आणि नव्या व्यक्तीच्या कामाची तुलना करावी, असं अजित पवार म्हणाले.



अजित पवार म्हणाले,मला एका गोष्टीची जाणीव आहे, कार्यकर्त्यांच्या जोरावर पक्ष चालतो. कार्यकर्ता पक्षाचा कणा असतो. त्या कण्यानं काम नाही केलं तर गडबड होते मान्य केलं पाहिजे. कोणतिही निवडणूक असो किंवा आजची बैठक असो, कार्यकर्त्यांच्या एकंदरित जिवावर निवडणूक आणि यश अवलंबून असते. माझ्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासून ते आता उपमुख्यमंत्रिपदापर्यंत अनेक जबाबदारी कार्यकर्त्यांमुळं मिळाली असं अजित पवार म्हणाले. मी पण शेवटी माणूस आहे, मला पण विचार येतो एवढी सगळी कामं करुन बारामतीकर वेगळा निर्णय घेऊ शकतात. मग आपण तर दुसऱ्यांना खासदार करु शकतो. नितीन पाटलांना, प्रफुल पटेलांना खासदार केलं. आमदार राजेश विटेकरला केलेलं तुम्ही पाहिलं, शिवाजीराव गर्जे यांना आमदार केलं. अशी जर गंमत होणार असेल तर झाकली मूठ सव्वा लाखाची चांगली. आपण लाखानं निवडून येणारी माणसं, मी पण आता ६५ वर्षांचा झालो. आपण पण तसं समाधानी आहे.जिथं पिकतं तिथं विकत नसतं,बारामतीकरांना कोणतरी मी सोडून आमदार मिळाला पाहिजे, मग तुम्ही माझी १९९१ ते २०२४ या माझ्या कारकिर्दीची तुलना करा आणि त्या माणसाचं काम बघा, असं अजित पवार म्हणाले. न सांगता रस्ता होतोय, न सांगता पिण्याच्या पाण्याच्या योजना होतात, आता किती कोटींच्या योजनांची कामं सुरु आहेत. बारामती शहर सोडून साडे सातशे कोटी रुपयांची कामं सुरु आहेत. कशाला म्हणतात साडे सातशे कोटी, यापूर्वी बारामती तालुक्यातील रस्ते कसे होते. आता कसे आहेत, काही खराब आहेत ते कसे करायचे ते पाहू, न मागता मेडिकल कॉलेज मिळतं, तुम्ही सांगितलं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं नाव द्या मग पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मेडिकल कॉलेज केल्याचं अजित पवार म्हणाले. सकाळपासून उठून कामं करावी लागतात पण काही जण आमची चेष्टा करतात, त्याच्याबद्दल म्हणनं काही नाही, जे आहे ते आहे, असं अजित पवार म्हणाले. ही बारामतीच्या भवितव्याची निवडणूक आहे, सत्तेत असू तर अर्थकारणाला गती मिळणार आहे, असं अजित पवार म्हणाले.

## आमदार महेश लांडगे यांना जिवे मारण्याची धमकी; आरोपी ताब्यात

पुणे । प्रतिनिधी

भोसरीचे आमदार महेश लांडगे यांना एका व्यक्तीने जिवे मारण्याची धमकी दिली. त्याला पिंपरी चिंचवड पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. उदयकुमार राय (रा. भोसरी. मूळ रा. छत्तीसगड) असे



ताब्यात घेतलेल्या संशयित व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी उदयकुमार राय नावाच्या व्यक्तीने पिंपरी चिंचवड पोलीस नियंत्रण कक्षाला फोन केला. आमदार महेश लांडगे यांची सुपारी मला मिळाली असल्याचे त्याने नियंत्रण कक्षात फोन करून सांगितले. त्यानंतर पोलिसांची एकच धावपळ उडाली. पोलिसांनी तत्काळ तांत्रिक विश्लेषण करून फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीचा ठावठिकाणा शोधला आणि त्याला ताब्यात घेतले. याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. उदयकुमार हा मागील पाच वर्षांपासून भोसरी परिसरात राहत आहे. त्याने अशा प्रकारचा फोन का केला, याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

# अल्पवयीन असताना दाखवलं लग्नाचं आमिष, लैंगिक संबध अन् गर्भवती राहिल्यावर लग्नास नकार

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातील धक्कादायक घटना**

राज्यात गेल्या काही दिवसांमध्ये अल्पवयीन मुली महिला यांच्यावर होणाऱ्या अत्याचारामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचं चित्र दिसून येत आहे. अशातच पुण्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. मुलगी अल्पवयीन आहे हे माहिती असताना तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही अल्पवयीन पिडीत मुलगी ही गर्भवती राहिल्यानंतर आरोपीने लग्न करण्यास नकार दिल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.

मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असताना देखील आरोपीने तिला लग्नाचं आमिष दाखवत तिच्यासोबत वारंवार शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर ती गर्भवती राहिली, यावेळी आरोपीने पिडितेला लग्न करण्यास नकार दिला. याप्रकरणी १९ वर्षीय पीडितेने लोणी काळभोर पोलिस ठाण्यात आरोपीविरोधात फिर्याद दिली. यावरून पोलिसांनी संयोग संजय गायकवाड (वय २४, रा. माळीमळा, लोणी काळभोर) याच्यावर बलात्कारासह पोक्सो आणि ॲट्रोसिटीअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. प्रेमसंबंध तोडल्याच्या रागातून एका मुलीला मारहाण (उीळाश छशुी) करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी मुलीच्या आईने कोरेगाव पार्क पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी २० वर्षीय आरोपी तरुणाला अटक केली आहे.

पोलिसांनी घटनेबाबत दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि पीडित मुलीचे प्रेमसंबंध होते. मुलीने ते संबंध तोडल्याने आणि पुन्हा प्रेमसंबंध ठेवण्यास नकार दिल्याच्या रागातून आरोपीने तिला मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.